cmyk

# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७९ | मंगळवार दि. ०९ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महाराष्ट्राच्या राजकारणात

महाराष्ट्रात सध्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलताना दिसत आहेत. पहिल्या टप्प्यात महायुतीने स्पष्ट आघाडी घेतली असली, तरी या विजयामागे विरोधकांची कमजोरी अधिक आणि सत्ताधाऱ्यांची ताकद कमी असल्याचे चित्र आहे. महाविकास आघाडीतील उमेदवारांनी माघार घेतल्याने काही जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले.

# महायुतीची कर्जमाफी बनावट आणि फसवी

## ही तर शेतकऱ्यांची फसवणूक, विजय वडेट्टीवारांचा गंभीर आरोप




मुंबई । प्रतिनिधी

भाजप-महायुती सरकारने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही सरसकट कर्जमाफी नसून अटी-शर्तींच्या जंजाळातून शेतकऱ्यांची फसवणूक करणारी योजना असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच या योजनेला मंजुरी दिली असून, यासाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. तसेच २०१९ मधील कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र, या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही प्रत्यक्षात सर्व शेतकऱ्यांना लाभदायक ठरणार नाही. "ही सरसकट कर्जमाफी नसून अटी व शर्ती लावून दिलेली कर्जमाफी आहे. आमच्या सरकारच्या काळात कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या अनेक शेतकऱ्यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची संख्या कृत्रिमरीत्या कमी करण्यात आली आहे," असा आरोप त्यांनी केला. सरकारने ५५ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात हा आकडा १५ ते २० लाखांच्या दरम्यान राहू शकतो, असेही वडेट्टीवार यांनी सांगितले. "दोन लाख रुपये माफ केले जाणार असले तरी अनेक शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळवण्यासाठी उर्वरित थकबाकी भरावी लागणार आहे. तीन लाख रुपये भरण्याची क्षमता नसल्याने अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहतील,"

◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### फिलिपिन्समध्ये ७.८ तीव्रतेचा भूकंप

**दिल्ली :** फिलिपिन्सच्या दक्षिणेकडील मिंदानाओ बेटावर सोमवारी (दि.८) सकाळी शक्तिशाली भूकंपाचे धक्के बसले. ७.८ रिश्टर तीव्रतेच्या या भूकंपामुळे जनरल सॅंटोस शहरातील अनेक इमारती कोसळल्याचे वृत्त समोर आले आहे. भूकंपानंतर फिलिपिन्स आणि इंडोनेशियासाठी त्सुनामीचा हाय-अलर्ट जारी करण्यात आला असून, किनारपट्टी भागातील नागरिकांना तातडीने सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. या भूकंपामुळे निर्माण झालेल्या भीती आणि गोंधळाचे थरकाप उडवणारे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या माहितीनुसार, भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ५:०७ वाजता हा भूकंप झाला. भूकंपाचे केंद्र ९३ किलोमीटर खोलीवर फिलिपिन्समध्ये ५.६३५ उत्तर अक्षांश आणि १२५.१४७ पूर्व रेखांश येथे नोंदवण्यात आले.

### मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनेलचे सर्व उमेदवार विजयी

**कोल्हापूर :** अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत मेघराज भोसलेंच्या नेतृत्वाखाली समर्थ पॅनेलचे सर्व उमेदवार विजयी झाले. पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात सोमवारी (दि.८) सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरूवात होऊन निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी विजयी उमेदवारांकडून गुलाल उधळून जल्लोष करण्यात आला. कोल्हापूरसह पुणे, मुंबई, नाशिक, सोलापूर येथे राज्यातील १२ केंद्रांवर ४९.९० टक्के मतदान झाले होते. या मतदानात ३४०३ पैकी १६९८ मतदारांनी मतदान केले. राज्यातील एकूण टक्केवारीत कोल्हापुरातील पद्माराजे गर्ल्स हायस्कूल केंद्रावर सर्वाधिक मतदान झाले होते.

### मोकाट कुत्र्याचा चिमुरडीवर भीषण हल्ला

**जिंतूर :** शहरातील बलसा रोड परिसरातील जमीर कॉलनी येथे भटक्या कुत्र्याने साडेतीन वर्षीय जमीर कॉलनीत राहणाऱ्या अलीशा फिरोज खान (वय साडेतीन वर्षे) या चिमुकलीवर हल्ला केला. या हल्ल्यात कुत्र्याने चिमुकलीच्या चेहरा, काना जवळ लचका तोडला. गंभीर जखमी चिमुरडीवर परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुसरीकडे शहरात आजपर्यंत अनेक चिमुरड्यांचे कुत्र्यांनी लचके तोंडलेले असताना नगर परिषद मात्र कुंभकर्णी झोपेते आहे. त्यामुळे नगर परिषदेच्या कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. न.प. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०६ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ६५.५० क्विंटल** | | |
| २,१५० | २,४०० | २,२८० |
| **ज्वारी/हायब्रिड: १११.०० क्विंटल** | | |
| २,२९१ | ३,९६८ | २,८०६ |
| **मका/लोकल: ३०.०० क्विंटल** | | |
| २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| **तूर : ३.५० क्विंटल** | | |
| ६,८०० | ७,३६१ | ७,१५३ |
| **उडीद : १.०० क्विंटल** | | |
| ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| **बाजरी: ५३.०० क्विंटल** | | |
| २,२०० | २,७४५ | २,३५५ |
| **मुग: ८.०० क्विंटल** | | |
| -- | -- | -- |
| **सोयाबीन: १.५० क्विंटल** | | |
| ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| **हरभरा: १३.५० क्विंटल** | | |
| ५,५८० | ७,३५८ | ६,८३९ |

## एनडीएच्या बैठकीसाठी राष्ट्रवादीचा वर्धापनदिन पुढे ढकलला

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा यंदाचा २७ वा वर्धापन दिन सोहळा एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. दरवर्षी १० जून रोजी साजरा केला जाणारा हा पक्षीय सोहळा आता गुरुवार, ११ जून रोजी दुपारी २ वाजता मुंबईतील किंग्ज सर्कल येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नवी दिल्लीत एनडीएची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आल्यामुळे हा बदल करण्यात आला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### सुनेत्रा पवार, तटकरे-पटेल दिल्लीला जाणार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना १० जून १९९९ रोजी झाली होती. मात्र या वर्षी १० जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत एनडीए घटक पक्षांची तातडीची बैठक बोलावली आहे. या राष्ट्रीय बैठकीला

◀◀ पान २ वर

# मध्यपुर्वेत तणाव वाढला !

## तात्काळ इराण सोडा; भारतीय नागरिकांना सूचना

तेहराण । वृत्तसंस्था

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने इराणचा प्रवास टाळण्याचा सल्ला पुन्हा जारी केला आहे. तसेच सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीयांसाठी उपलब्ध वाहतूक सुविधांचा वापर करून शक्य तितक्या लवकर देश सोडावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने सोमवारी (दि.८) भारतीय नागरिकांसाठी

◀◀ पान २ वर



### २४ भारतीय अडकले

एप्रिलमध्ये इराण आणि इस्रायल यांच्यात झालेल्या युद्धविरामानंतर दोन महिन्यांनी पुन्हा संघर्ष सुरू झाला आहे. इराणने रविवारी रात्री इस्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. लेबनॉनमधील हिजबुल्लाहवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचे इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने म्हटले आहे. प्रत्युत्तरादाखल, इस्रायलने इराणच्या अनेक लष्करी आणि संरक्षण तळांवर हल्ला केला. होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये ओमानच्या किनाऱ्याजवळ एका जहाजावर हल्ला झाल्याचे वृत्त समोर आले आहे. भारतीय खलाशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडिया या संघटनेने दावा केला आहे की, जहाजावर २४ भारतीय खलाशी आहेत आणि त्यांनी तातडीच्या मदतीचे आवाहन केले आहे. मात्र भारतीय अधिकाऱ्यांनी या प्रकरणी अधिकृत निवेदन जारी केले नाही.

# ५ कोटींच्या खंडणीसाठी तुकाराम मुंडेचे अपहरण

## पोलिसांची चाहुल लागताच डोळे बांधून रस्त्यावर सोडले

बीड/परळी । प्रतिनिधी

जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथून अपहरण करण्यात आले. यानंतर या व्यक्तीची वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील धोत्रा परिसरात सुटका झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अपहरण झालेल्या व्यक्तीचे नाव तुकाराम मुंडे असे आहे. या अपहरणाची बीडमध्ये जोरदार चर्चा आहे.

अपहरणकर्त्यांनी संबंधित व्यक्तीच्या कुटुंबीयांकडे तब्बल ५ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याची माहिती असून, पोलिसांचा दबाव वाढत असल्याची चाहूल लागताच आरोपींनी त्यांना धोत्रा गावाजवळील सुनसान रस्त्यावर डोळ्यांवर पट्टी बांधून सोडून पसार झाल्याचे सांगितले जात आहे. तुकाराम मुंडे (रा. परळी वैजनाथ, जि. बीड) हे परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रत कंत्राटदार म्हणून

◀◀ पान २ वर

# कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी एक हजार दिवस निर्णायक

### जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे डॉ.दीपक सावंत यांचे निर्देश



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील कुपोषणाचे आव्हान अद्याप कायम असल्याने गंभीर तीव्र कुपोषित (सॅम) आणि मध्यम कुपोषित (मॅम) बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी दिले. माता व बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस कुपोषण रोखण्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे असल्याचे नमूद करत जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला.

कुपोषित बालकांची स्थिती, उपचार व्यवस्थापन आणि विविध पोषण योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना बालकांचे नियमित वजन मोजणे, अद्ययावत नोंदी ठेवणे, पोषण पंधरवाडा, चावडी वाचन आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून जनजागृती वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आदिवासी भागातील मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, गर्भवती महिलांचे पोषण, रक्तक्षय नियंत्रण तसेच कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी करण्यावर विशेष भर देण्यात आला. अमृत आहार योजनेच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. लाभार्थ्यांना केळी, अंडी आणि इतर पोषक आहाराचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्याबाबत सांगण्यात आले आहे. धाराशिव,

◀◀ पान २ वर

# वितळलेलं पोलाद अंगावर सांडल्याने ८ कामगारांचा होरपळून मृत्यू

हैद्राबाद । वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील पोलाद कारखान्याच्या एसएमएस-२ आणि एसटीसी-३ उष्णता केंद्रांमधून मोठ्या प्रमाणात वितळलेले पोलाद गळती झाल्याने आठ कामगारांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत.

विशाखापट्टणम स्टील प्लांटचे सर्कल इन्स्पेक्टर केशव राव यांनी दिलेल्या माहितीनुसार, वितळलेले स्टील वाहून नेणाऱ्या एका पळीचा (लॅडल) अतिशय उच्च तापमानावर स्फोट झाल्याने ही दुर्घटना घडली. स्टील प्लांटमध्ये घबराट पसरली आणि कामगार जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले. प्लांटचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत आठ मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, मृतांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबत माहिती मिळताच राज्याच्या गृहमंत्री वंगलपुडी अनिता यांनी घटनास्थळी धाव दुर्घटनेचा आढावा घेत प्रशासनाला तातडीने मदत करण्याचे निर्देश दिले. तसेच जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत आणि अपघातस्थळी बचाव व मदतकार्याला गती द्यावी, असे निर्देश मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# इंडिया आघाडीच्या बैठकीत ५ मुद्यांवर सहमती



### महागाई, शेतकरी प्रश्नी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

विरोधकांच्या इंडिया आघाडीची बैठक सोमवारी (दि. ८ जून) दिल्लीत पार पडली. या बैठकीत काँग्रेससह २३ राजकीय पक्षांच्या नेत्यांचा सहभाग होता. या बैठकीत पाच मुद्यांवर सहमती झाली. यानंतर बोलताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी, केंद्र सरकारने सध्याची बिकट आर्थिक

◀◀ पान २ वर

# राजकारणाचा रोख आता रोजगार-शिक्षणावर असावा



### पत्रकार परिषदेत अभिजीत दिपके यांची स्पष्टोक्ती

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

मागील १० ते १२ वर्षात देशाचे राजकारण हिंदू-मुस्लिम अजेंड्याभोवती फिरत आहे. मात्र या मुद्यामुळे तरूणांना नोकऱ्या मिळणार नाहीत. आता देशाच्या राजकारणाचा रोख बदलून रोजगार आणि शिक्षण सारख्या महत्वाच्या विषयावर येणे गरजेचे असल्याची भूमिका कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी मांडली.

दिल्लीतील जंतर-मंतर येथील यशस्वी आंदोलनानंतर अभिजीत दिपके यांनी छत्रपती संभाजीनगर येथे सोमवारी सकाळी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी बोलताना वरील भूमिका मांडली. यावेळी नीट आणि सीबीएसई परिक्षेच्या गोंधळावरून केंद्रीय शिक्षा मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी यावेळी लावून धरली. यावेळी बोलताना अभिजित दिपके पुढे म्हणाले की, देशातील तरूणांसाठी शिक्षण आणि रोजगार हे सर्वोत मोठे प्रश्न आहेत. केंद्र सरकारने प्राधान्यक्रम बदलण्याची गरज असून, शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यानंतरही शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी हे आंदोलन सुरुच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. परिक्षेतील घोटाळ्यावरून केंद्रावर निशाणा साधताना ते म्हणाले, खासगी

◀◀ पान २ वर

# दादांच्या राष्ट्रवादीत तटकरे-पटेल पुन्हा 'पॉवरफुल'!




मुंबई-बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर आणि लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अजित पवार यांच्या पक्षात मोठी धुसफूस सुरू असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या होत्या. प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे अजितदादांच्या गटात एकाकी पडले असून, पक्ष फुटण्याच्या उंबरठ्यावर आहे, असा दावा प्रामुख्याने शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला होता. मात्र, आगामी राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीच्या उमेदवार घोषणेनंतर पक्षात अजूनही प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांचेच 'प्रमाण' (वर्चस्व) चालते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

सुनेत्रा पवार यांच्या रिक्त झालेल्या जागेवर राज्यसभेसाठी पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आणि नुकत्याच पक्षात येण्यास उत्सुक असलेल्या नवनीत राणा यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. छगन भुजबळ हे स्वतः या जागेसाठी आग्रही होते. मात्र, यासाठी त्यांनी काही अटी घातल्या होत्या ते राज्यसभेवर गेले तर कुटुंबातीलच एकाला मंत्रिमंडळात घ्यावे असा आग्रह भुजबळांचा होता मात्र या सर्व बड्या नेत्यांना बाजूला सारत प्रफुल पटेल यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जाणारे



◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# महाराष्ट्राच्या राजकारणात वाढता गोंधळ आणि अस्थिरतेची चाहूल

महाराष्ट्रात सध्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलताना दिसत आहेत. पहिल्या टप्प्यात महायुतीने स्पष्ट आघाडी घेतली असली, तरी या विजयामागे विरोधकांची कमजोरी अधिक आणि सत्ताधाऱ्यांची ताकद कमी असल्याचे चित्र आहे. महाविकास आघाडीतील उमेदवारांनी माघार घेतल्याने काही जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. मात्र या राजकीय घडामोडींमध्ये राज्यातील खऱ्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर अनेक विकासकामे रखडली आहेत. शेतकरी कर्जमुक्तीसारखे महत्त्वाचे विषय मागे पडले आहेत. दुसरीकडे पुणे आणि नाशिक हे जिल्हे विविध गुन्हेगारी घटनांमुळे चर्चेत आले आहेत. विषारी दारूमुळे होणारे मृत्यू, धर्मांतराच्या कथित प्रकरणांवरील वाद, वाढती गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न यामुळे सामान्य नागरिक अस्वस्थ आहे.

महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमध्ये अंतर्गत संघर्ष सुरू आहे. मित्रपक्ष एकमेकांवर आरोप करत आहेत. काही ठिकाणी बंडखोरीचे सूर उमटत आहेत. संभाजीनगरमध्ये शिवसेनेचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी भाजपविरोधात भूमिका घेतली, तर दुसरीकडे दोन्ही शिवसेना पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात नवीन चर्चांना उधाण आले आहे. या घडामोडी राज्यातील राजकारण किती अस्थिर झाले आहे, याचे संकेत देतात. शिक्षण क्षेत्रातील नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाने तर केंद्र आणि राज्य सरकार दोघांनाही अडचणीत आणले आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर स्पष्ट आणि ठोस उत्तर मिळत नसल्याने तरुणाईमध्ये असंतोष वाढत आहे. अशा वातावरणात नव्या राजकीय पर्यायांविषयी आकर्षण निर्माण होणे स्वाभाविक आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून आंदोलनांना मिळणारा प्रतिसाद आणि तरुणांच्या मनातील अस्थिरता हे भविष्यातील राजकारणासाठी महत्त्वाचे संकेत मानावे लागतील.

मराठा आरक्षण, ओबीसी समाजाच्या भावना, मनोज जरांगे-पाटील यांचे आंदोलन आणि त्यावर सरकारची भूमिका या प्रश्नांनीही राज्यातील सामाजिक समतोल ढवळून निघाला आहे. सरकार एका बाजूला मराठा समाजाला आश्वासने देत असताना दुसऱ्या बाजूला ओबीसी समाजात नाराजी वाढत असल्याचे दिसत आहे. हा संघर्ष अधिक तीव्र झाला तर त्याचे परिणाम राजकीय स्थैर्यावर होऊ शकतात. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट, शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील संघर्ष, पक्षांतराचे वाढते प्रमाण आणि तात्काळ मिळणाऱ्या उमेदवाऱ्या यामुळे विचारसरणीपेक्षा सत्तेचे गणित महत्त्वाचे बनल्याची टीका होत आहे. पक्षांतर करून आलेल्या नेत्यांना त्वरित उमेदवारी देण्याच्या घटनांनी कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण होणे स्वाभाविक आहे.

देश आणि राज्यासमोर आर्थिक तसेच सुरक्षा विषयक आव्हानेही उभी आहेत. जागतिक परिस्थिती, युद्धजन्य वातावरण आणि त्याचा इंधन तसेच उद्योगांवर होणारा परिणाम याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अशा वेळी राजकीय पक्षांनी परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी राष्ट्रीय आणि राज्यहिताला प्राधान्य देणे अपेक्षित आहे.

आज महाराष्ट्रात जवळपास प्रत्येक दिवस नवा वाद, नवा आरोप आणि नवी राजकीय चर्चा घेऊन उगवत आहे. विकास, शिक्षण, रोजगार, शेती आणि कायदा-सुव्यवस्था यांसारखे मूलभूत प्रश्न मात्र मागे पडत आहेत. राजकीय पक्षांच्या अंतर्गत कलहामुळे आणि सोशल मीडियावरून होणाऱ्या आक्रमक प्रचारामुळे समाजात ध्रुवीकरण वाढत आहे.

लोकशाहीत मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु मतभेदांचे रूपांतर अराजकतेत होऊ नये याची जबाबदारी सत्ताधारी आणि विरोधक दोघांचीही आहे. महाराष्ट्राची परंपरा ही विवेक, विकास आणि सामाजिक सलोखा यांची राहिली आहे. राजकीय लाभासाठी समाजात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न झाले, तर त्याचे दुष्परिणाम संपूर्ण राज्याला भोगावे लागू शकतात.

म्हणूनच आज गरज आहे ती निवडणूक जिंकण्यापेक्षा जनतेचा विश्वास जिंकण्याची. सत्ता येते-जाते, पण राज्याचे स्थैर्य आणि समाजातील एकोपा टिकून राहणे हेच खरे लोकशाहीचे यश असते.

# छत्रपती मल्टीस्टेट सोसायटीचे दोन संचालक अटक

## आर्थिक गुन्हे शाखेची कामगीरी, ४ दिवसाची पोलीस कोठडी

जालना । प्रतिनिधी

पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे गु.र.नं. २८९/२०२५ कलम ४२०, ४०९, ३४ भाविसह कलम ३,४,५ प्रमाणे दाखल गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक यांचे आदेशाने आर्थिक गुन्हे शाखा जालना हे करीत आहे.

गुन्हयाची थोडक्यात सविस्तर माहिती अशी की छत्रपती मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन संतोष भंडारी व संचालक आणि बँकेचे मॅनेजर यांनी जास्त व्याजदर देण्याचे आमीष दाखवुन खातेदारांना ठेवि ठेवण्यास प्रवृत्त करुन ठेवी मोठ्या प्रमाणावर झाल्यावर ठेविदारांच्या ठेवी परत दिल्या नाही. चेअरमॅन संतोष बसवंत भंडारी रा. छत्रपती संभाजीनगर (कायमचा पत्ता रा. ता. गेवराई जि. बीड) यांच्या २१ शाखा असुन शाखेच्या माध्यमातुन छ. संभाजीनगर, बीड, जालना जिल्ह्यामध्ये विविध प्रकारे मोठ्या प्रमाणात लोकांची फसवणुक केलेली आहे. चेअरमन ग्राहकांच्या स्वतःहुन घरी जावुन डिपॉजिट करण्यास प्रवृत्त करुन मोठ्या प्रमाणावर फिर्यादी व इतर गुंतवणुकदार यांची आर्थिक फसवणुक केल्या बाबत दिलेल्या सविस्तर तक्रारी वरुन गुन्हा दाखल आहे. गुन्हयात फिर्यादींची व साक्षीदारांची अशी १ कोटी, ३१ लाख, ४४ हजार रुपयांची छत्रपती मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन संतोष बसवंत भंडारी व संचालक आणि बँकेचे मॅनेजर यांनी फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

**अटक आरोपी :** १) राजीव सतीशराव काळे वय ४० वर्षे राहणार धनगर गल्ली गेवराई जिल्हा बीड २. विठ्ठल पांडुरंग रुचके वय ४७ वर्षे राहणार सिरसदेवी तालुका गेवराई जिल्हा बीड यांचा सक्रीय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना आज दिनांक ८/६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

कामगिरी पथक

मा. श्री. तेघबीर सिंह संधू पोलीस अधीक्षक जालना, श्री. विक्रम साळी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री. सुरेश उनवणे प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिथुन घुगे सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा जालना, शैलेश म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, आणि पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

# जालन्यात एमडी ड्रग्ससह आरोपी अटक

जालना । प्रतिनिधी

जालन्यात एक इसम मेरीट हॉटेल ते रेल्वे स्टेशन परीसरात एमडी पावडर विक्री करण्यासाठी येणार आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्यावरुन पोनि जनार्धन शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली मध्यरात्री ०३.४० वाजताचे सुमारास कदीम जालना पोलीस ठाण्याकडील पोलीस पथकांनी दोन पंचासोबत मेरीट हॉटेल रेल्वे स्टेशन जवळ जावुन बातमीदार यांनी दिलेल्या माहीतीप्रमाणे सदर ठिकाणी सापळा लावुन सदर आरोपी यास इको गाडीत बसलेला असतांना वेढा घालुन जागीच ताब्यात घेतले आहे. सदर इसमाच्या ताब्यात मानवी शरीरास घातक असलेला व अंमली पदार्थ कायदयानुसार प्रतिबंधीत असलेला एम.डी. (मेफड्रोन) मिळुन आला आहे. याप्रकरणी



गु.र.नं.३०१/२०२६, गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८, (क) २० (ब) प्रमाणे

१) १५७५०/-रुपये किंमतीची १.०५ ग्रॅम वजनाची तपकिरी रंगाची पावडर सारखा पदार्थ झीपलॉक पिशवीसह किंअं. २) २३४००/-रुपये किंमतीची १.५६ ग्रॅम वजनाची तपकिरी रंगाचा पावडर सारखा पदार्थ झीपलॉक पिशवीसहकिंअं.

३) ४,००,०००/-रुपये किंमतीची एक मारुती सुझुकी कंपनीचा पांढ-या रंगाची इको कार क्रमांक ४८९३३२ जु.वा.कि.अ.

)१०,०००/- रुपये किंमतीचा एक काळया रंगाचा रेडमी कंपनीचा ११ मॉडेलचा मोबाईल जु.वा.किं.अं.

४ ५) १०००/- रुपये किंमतीचा एक पांढ-या रंगाचा कंपनीचा वजनकाटा जु.वा.कि.अं.

६)००.००/- रुपये किंमतीचा २० रिकाम्या प्लॉस्टीकच्या झीपलॉक पिशव्या जु.वा.कि.अं. ४,५०,१५०/- मुद्येमाल जप्त करण्यात आला व

**आरोपी** अफरोज जाफर शेख वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२ हिनानगर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

सदरची कारवाई मा.श्री. तेघबीर सिंह संधू, पोलीस अधीक्षक , मा.श्री. विक्रम साळी, अप्पर पोलीस अधीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.जे.बी.शेवाळे, पोलीस निरीक्षक, कदीम जालना पोलीस ठाणे, पोउपनि श्री. दिनकर मोरे, पोहेकों/सदा राठोड, पोहेकॉ/ सचीन चौधरी पोकॉ/मतीन शेख, पोकॉ/इम्रान खान, पोकॉ/ झेंडे, पोकॉ/६३४ कृष्णा चव्हाण, पोकॉ/विलास राऊत, पोकॉ/ प्रदीप पवार सर्व नेमणुक कदीम जालना पोलीस ठाणे यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि श्री. दिनकर मोरे हे करीत आहे.

## पान ६ वरून...

### अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये

पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देणारे फलक हातात घेऊन नागरिकांना वृक्षसंवर्धनाचे आवाहन केले.

यानंतर विद्यार्थ्यांनी वनपरिक्षेत्र कार्यालय, शेरी बुद्रुक येथे भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वृक्षांची माहिती देण्यात आली. तसेच वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाची प्रतिज्ञा घेतली.

यावेळी वनक्षेत्रपाल अधिकारी आष्टी श्री. ए. डी. मुंढे, वनपाल श्री. डी. डी. जायभाये, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. एस. पी. आरशेवाद, वनपाल श्री. एल. व्ही. तागड तसेच सौ. सविता निकम यांनी विद्यार्थ्यांना वनसंपदेचे महत्त्व, जैवविविधतेचे संरक्षण आणि वृक्षसंवर्धनाची आवश्यकता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे प्रत्यक्ष धडे मिळाले असून, निसर्गाविषयी प्रेम व जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत, हरजोत कौर जोगी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला.

### कार अडवून चाकूचा

सपोनि दराडे यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोउपनि कुकलारे यांच्याकडे सोपविण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे. पहाटेच्या वेळी महामार्गावर घडलेल्या या धाडसी प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांसमोर आरोपींना लवकरात लवकर जेरबंद करण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

### कुसळवाडी तांड्यावर

आधारे दि. ०६ जून २०२६ रोजी सकाळी ९:५३ वाजता कुसळवाडी तांडा येथे छापा टाकण्यात आला. कारवाई पथकात उपनिरीक्षक एस. टी. कुबडे, उपनिरीक्षक जे. व्ही. कोरे यांच्यासह एस.एस. लोमटे, के.एस. जरवाल, जवान विभीषण वायबट व महिला जवान कु. रागिणी मुंडे यांनी सहभाग घेतला.घटनास्थळी लोखंडी ड्रममध्ये मोठ्या प्रमाणात कच्चे रसायन आढळले. उत्पादन शुल्क कायद्यांतर्गत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे. अवैध दारू धंद्यांमुळे युवकांचे आरोग्य धोक्यात येते. अशा धंद्यांची माहिती नागरिकांनी १०० नंबर किंवा उत्पादन शुल्क कार्यालयास द्यावी, असे आवाहन विभागाने केले आहे.

### स्पर्धेच्या युगात पदवी

फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.आर. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर आदित्य डी. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. पवार म्हणाले की, महाविद्यालय हे विद्यार्थ्यांना केवळ पदवी देत नाही, तर त्यांच्या भविष्याला आणि स्वप्नांना यशस्वी दिशा देण्याचे पवित्र काम करत असते. आमचे प्राधान्य नेहमीच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच रोजगाराच्या सर्वोत्तम संधी मिळवून देण्याला राहिले आहे.आज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना थेट नामांकित कंपन्यांमध्ये करिअर घडवण्याची मोठी संधी मिळाली आहे. कॅम्पस इंटरव्ह्यू हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल असते. आज तुम्हाला तुमच्या शिक्षणातून मिळवलेल्या ज्ञानाची, कौशल्यांची आणि आत्मविश्वासाची खरी परीक्षा द्यायची आहे. गेल्या अनेक वर्षांच्या तुमच्या कठोर परिश्रमाचे फळ मिळवण्याची ही संधी आहे. यश मिळवण्यासाठी केवळ गुण महत्त्वाचे नसतात, तर तुमचा आत्मविश्वास, संवादकौशल्य, सकारात्मक विचार आणि प्रामाणिकपणा देखील तितकाच महत्त्वाचा असतो. स्वप्न पाहणे सोपे आहे, पण ती सत्यात उतरवण्यासाठी अपार मेहनत करावी लागते. असे ते म्हणाले.

या निवडीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी संस्था आणि महाविद्यालयाचे आभार मानले. आजच्या अत्यंत स्पर्धात्मक युगात शिक्षण पूर्ण होताच हाताला प्रतिष्ठित नोकरी मिळणे खूप कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत महाविद्यालयाने आमच्यासाठी ही थेट संधी उपलब्ध करून दिली, याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. या मिळालेल्या संधीचा उपयोग आम्ही आमच्या पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी नक्कीच करू,असा विश्वास विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. पवार डी. आर. यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात कशाप्रकारे उच्च पदांवर झेप घेता येईल, याविषयी मोलाचे तंत्र सांगितले. सूत्रसंचालन प्रा. गोविंद मुंडे यांनी केले. डॉ. देवेश चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.गोविंद मुंडे, डॉ. देवेश चव्हाण, डॉ. विशाल सनान्से, प्रा. प्रसाद चव्हाण, प्रा. मुळे मुंजाजी, प्रा. कुटे चैतन्य, प्रा. शितल शिंदे, प्रा. जाधव रोहिणी, प्रा. शुभम रांदड, प्रा. स्वाती धस, प्रा. तोरकड शिवाजी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**या विद्यार्थ्यांची झाली निवड**

या निवड प्रक्रियेत अद्चीत्रे आशिष, चावरे करण, कानडे ऋतुजा, गव्हाणे रेश्मा, सुरवसे वैभव, सुर्वे अजय, विश्वनाथ स्वामी, नितिन राठोड , वैजनाथ लोखंडे, विवेक शिंदे , पायाल राठोड, ऋतुजा थांबरे, क्रांती पटाईत आणि कोमल खरात या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली.

### संत भगवानबाबा शासकीय

सर्व विद्यार्थ्यांना निवास आणि भोजनाची व्यवस्था मोफत दिली जाईल. शालेय वह्या, पुस्तके आणि स्टेशनरीचे विनामूल्य वाटप करण्यात येईल. जिल्हा पातळीवरील विद्यार्थ्यांना दरमहा ६०० रुपये, तर तालुका पातळीवरील विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये भत्ता थेट दिला जाईल. मुख्य अट: विद्यार्थ्याचे आई-वडील अधिकृत ऊसतोड कामगार असणे आवश्यक आहे. चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील यादीतील आपापल्या तालुक्याच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहाच्या ठिकाणी थेट संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत, असेही समाजकल्याण विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### अतिभारित व अवैध मालवाहतूक

वहन क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतूक करणारी तसेच मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणारी वाहने आढळून आल्यास संबंधित वाहनांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी दिली. रस्ते सुरक्षा सुनिश्चित करणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे तसेच वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. वाहन मालक व चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही परिवहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### जिल्हा महसूल प्रशासनाचे

दैठणा पैठण या भागामध्ये जाऊन ड्रोन द्वारे वाळूचा उपसा किती झाला याची नोंद घेतली मंजूर वाळू घाटाची माहिती घेतली मात्र यावेळी जिल्हा पथकाला काही महसूल मधील कर्मचाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असल्याचे बोलले जात आहे चकलांबा मंडळातील काही अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या या पथकाला दिशाभूल करण्याची माहिती देत टोपी घातल्याची चर्चा आहे घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळाली नसतानाही वाळू मिळाली असल्याचे भासवण्यात आले हे काम जिल्हाधिकारी व त्यांच्या पथकाने यापूर्वीच करणे गरजेचे होते मात्र आता वाळू पूर्णपणे उपसा झालेला असताना आता पाहणी आणि तपासणी करून काय उपयोग म्हणजे जिल्हा प्रशासनाचे वरातीमागून घोडे असेच म्हणावे लागेल.

## पान १ वरून...

### महायुतीची कर्जमाफी

असे ते म्हणाले. योजनेच्या अटींनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले पीक कर्ज ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असावे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नसावी, तरच दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळणार आहे. यावर टीका करत वडेट्टीवार यांनी प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचे म्हटले. ''ज्या शेतकऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही कर्जफेड केली, त्यांना कोणताही लाभ मिळत नाही. उलट कर्ज थकवणाऱ्यांनाच फायदा मिळत आहे. त्यामुळे सरकारची ही योजना प्रामाणिक कर्जफेडीला प्रोत्साहन देणारी नसून कर्ज थकवण्यास उत्तेजन देणारी आहे,'' असा आरोप त्यांनी केला. या योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांचे निराकरण होणार नसल्याचा दावा करत काँग्रेसने सरकारकडून अधिक स्पष्टता आणि सरसकट कर्जमाफीची मागणी केली आहे.

### मध्यपुर्वेत तणाव

महत्त्वाची प्रवास सूचना जारी केली.

इराणचा कोणताही प्रवास टाळावा तसेच सध्या तेथे असलेल्या भारतीयांनी तातडीने सुरक्षितपणे देशाबाहेर पडावे, असे आवाहन भारताने पुन्हा केले आहे. तेहरानमधील भारतीय दूतावासाने जारी केलेली ही आठवी ॲडव्हायजरी असून प्रदेशातील वाढत्या सुरक्षा चिंतेचा आणि घडामोडींचा उल्लेख त्यामध्ये करण्यात आला आहे. भारतीय दूतावासाने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत म्हटले आहे की, ''प्रदेशातील ताज्या घडामोडी लक्षात घेता, सर्व भारतीयांनी इराणचा कोणताही प्रवास टाळावा. तसेच सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीयांनी उपलब्ध वाहतूक साधनांचा वापर करून शक्य तितक्या लवकर देश सोडावा.'' ही सूचना इराणमधील सर्व भारतीयांसाठी लागू असून त्यामध्ये विद्यार्थी, व्यावसायिक, भाविक आणि पर्यटक यांचाही समावेश आहे. तेहरानकडून करण्यात आलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या प्रत्युत्तरात इस्रायलने मध्य आणि पश्चिम इराणमधील लक्ष्यांवर हवाई हल्ले केल्याच्या वृत्तानंतर परिस्थिती आणखी तणावपूर्ण बनली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रदेशात संघर्ष तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

भारत सरकारने यापूर्वीही ७ एप्रिल रोजी खबरदारीचा इशारा जारी केला होता. त्यावेळी भारतीयांना किमान ४८ तास सुरक्षित स्थळीच राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवरील नाकेबंदी हटवली नाही, तर ''रात्री संपूर्ण जग उद्ध्वस्त होईल,'' असा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. यानंतर एप्रिलमध्ये युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर भारतीय दूतावासाने इराणमधील भारतीयांना तात्पुरत्या शांततेचा फायदा घेत त्वरीत देश सोडण्याचा सल्लाही दिला होता. अधिकृत आकडेवारीनुसार अद्याप सुमारे ७,५०० भारतीय नागरिक इराणमध्ये असल्याची माहिती समोर आली आहे.

### दादांच्या राष्ट्रवादीत तटकरे

कार्यरत होते. ४ जून २०२६ रोजी दुपारी काम आटोपून घरी परतत असताना तीन अज्ञात इसमांनी त्यांचे जबरदस्तीने चारचाकी वाहनातून अपहरण केले होते. या घटनेनंतर कुटुंबीयांकडे मोठ्या रकमेची खंडणी मागण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. दरम्यान, बीड पोलिसांचे गुन्हे अन्वेषण पथक आरोपींचा शोध घेत विविध ठिकाणी तपास करत अमरावती पर्यत पोहोचली होती. ७ जून रोजी धोत्रा परिसरातील रस्त्यालगत डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या अवस्थेत सोडण्यात आल्यानंतर तुकाराम मुंडे यांनी मदतीसाठी हाक मारली. त्याचवेळी त्या मार्गाने दुचाकीवरून जात असलेले प्रसन्ना घेमराज मांडवकर (रा. आंजदा वर्धा) यांनी मदत केली. मुंडे हे घाबरलेल्या अवस्थेत असल्याने काहीतरी गंभीर प्रकार घडल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यांची विचारपूस केली. यावेळी मुंडे यांनी आपल्यासोबत घडलेली संपूर्ण आपबिती सांगितली. प्रसन्ना मांडवकर यांनी प्रसंगावधान दाखवत तुकाराम मुंडे यांना आपल्या दुचाकीवरून हिंगणघाट पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी तातडीने त्यांच्या नातेवाईकांशी तसेच परळी वैजनाथ पोलिसांशी संपर्क साधून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर तुकाराम मुंडे यांना पुढील तपासासाठी परळी वैजनाथ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### दादांच्या राष्ट्रवादीत

राजेंद्र जैन यांच्या नावाची राज्यसभेसाठी घोषणा केली. यामुळे राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजेंद्र जैन हे पटेल यांचे निकटवर्तीय आहेत. ते गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये दोन वेळा विधानपरिषद सदस्य राहिलेले आहेत. याशिवाय पक्षाचे सरचिटणीस देखील होते. दुसरीकडे, सुनील तटकरे यांनी देखील पक्षात आपले वजन पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी सुनील तटकरे यांनी आपले पुतणे अनिकेत तटकरे यांना उमेदवारी मिळवून देण्यात यश मिळवले आहे. (अविरोध निवडूनही आणले) लोकसभेला सुनील तटकरे स्वतः निवडून आले आणि आता विधान परिषदेत पुतण्याला संधी मिळाल्यामुळे तटकरे कुटुंबाचे पक्षावरील वर्चस्व अधिक घट्ट झाले आहे. सुनेत्राताई पवार यांनी पक्षाचे सूत्र हाती घेतल्यानंतर दोन्ही पुत्र पार्थ आणि जय यांच्याकडे पक्षातील काही अधिकार दिले होते. त्यामुळे तटकरे, प्रफुल पटेल बाजूला सरकल्याची चर्चा माध्यमातून सुरू होती, मात्र प्रत्यक्षात तसे काहीच दिसून आले नाही. उलट त्यांच्याच घरातील व्यक्तींना विधान परिषदेसाठी संधी दिली गेली. प्रफुल पटेल यांनी त्यांचे निकटवर्तीय व पीए म्हणून राहिलेले राजेंद्र जैन यांची राज्यसभेसाठी घोषणा केली म्हणजे आजही पटेल, तटकरे यांचे पक्षात वर्चस्व आणि वजन असल्याचे दिसते. काही दिवसांपूर्वीच शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर थेट निशाणा साधला होता. दादांच्या निधनानंतर (पक्षीय पातळीवरील राजकीय पडझड किंवा फुटीच्या संदर्भाने) हे दोन्ही नेते शरद पवार गटाच्या निशाण्यावर होते. ''अजितदादांच्या राष्ट्रवादीत या दोघांबद्दल तीव्र नाराजी असून, पक्ष कधीही फुटू शकतो,'' असा दावा रोहित पवारांनी केला होता. नेत्यांमधील अंतर्गत नाराजी आणि विरोधकांच्या टीकेला न जुमानता, पक्षात शेवटी पटेल आणि तटकरे यांच्याच शब्दाला अंतिम मानल्याचे या तिकीट वाटपावरून स्पष्ट दिसते आहे. छगन भुजबळ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला डावलून पटेल यांच्या निकटवर्तीयाला राज्यसभेवर पाठवल्यामुळे पक्षात ओबीसी विरुद्ध इतर असा अंतर्गत संघर्ष पुन्हा पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. थोडक्यात सांगायचे तर, सर्व वादळ आणि चर्चांना पूर्णविराम देत सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीत आपलेच वर्चस्व आणि प्रमाण चालते, हे या निवडणुकांच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले आहे.

### एनडीएच्या बैठकीसाठी

देशभरातील एनडीएचे सर्व प्रमुख घटक पक्ष, त्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि खासदार उपस्थित राहणार आहेत. महायुती आणि एनडीएचा एक भाग म्हणून या बैठकीला उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक असल्याने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे १० जून रोजी दिल्लीत असणार आहेत. दिल्लीतील बैठक पूर्ण करून सर्व नेते परतल्यानंतर, ११ जून रोजी दुपारी २ वाजता षण्मुखानंद सभागृहातच हा सोहळा होईल. केवळ तारखेत बदल झाला असून जागा तीच आहे, हे तटकरे यांनी स्पष्ट केले. माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर पक्ष पहिल्यांदाच आपला वर्धापन दिन साजरा करत आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अतिशय संयमाने आणि धिरोदत्तपणे पक्षाची धुरा सांभाळत सुनेत्रा पवारांनी राष्ट्रीय अध्यक्षपद आणि राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. हा वर्धापन दिन दादांना समर्पण... संघर्ष आणि संकल्प या विचाराने साजरा केला जाणार असल्याची माहिती सुनील तटकरे यांनी सांगितली.

### कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी

सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मेळघाट, कोल्हापूर आणि निफाड आदी भागांतील स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. काही ठिकाणी कुपोषणाविरोधातील उपाययोजना अधिक तीव्र करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. दुर्गम भागांमध्ये डे-केअर सेंटरचा विस्तार आणि माता-बालकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले. डॉ. सावंत म्हणाले, ''कुपोषणमुक्त महाराष्ट्र हे केवळ शासकीय उद्दिष्ट नाही, तर राज्याच्या भावी पिढीच्या आरोग्याशी संबंधित मिशन आहे. बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. या काळात योग्य पोषण, वेळेवर उपचार आणि प्रभावी देखरेख सुनिश्चित केली तर कुपोषणावर निर्णायक मात करता येईल. प्रत्येक जिल्ह्याने मोजता येतील असे परिणाम साधण्यावर भर द्यावा.

### राजकारणाचा रोख

कंपन्यांमध्ये चुका झाल्यानंतर कामावरून काढून टाकले जाते. मग सरकारी परिक्षांचे पेपर वारंवार लीक होऊनही इथे जबाबदारी कोणीच का घेत नाही. जोपर्यंत शिक्षण मंत्री राजीनामा देत नाहीत तोपर्यंत सरकारला आपल्या चुकांची जाणीव झाली आहे, असे आम्ही कशावरून मानायचे असा सवाल करत धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा नाही दिला तर देशव्यापी आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. नेपाळ किंवा बांग्लादेशमधील सत्तांतराच्या आंदोलनाशी या आंदोसनाची तुलना करणे चुकीचे असल्याचे सांगत भारतात लोकशाही व्यवस्था आहे. आमचे जंतर मंतरवरील आंदोलन अंत्यत शांततापूर्ण होते. देशाच्या कानाकोपऱ्यातून तरूण सहभागी झाले होते, आमची पुढील आंदोलनेही अशाच प्रकारे शांततेच्या मार्गाने आणि मोठ्या प्रमाणावर असल्याचे स्पष्ट केले. हा लढा राजकिय नाही, कॉकरोच जनता पार्टी पूर्णपणे स्वंतत्र संघटना आहे. हे आंदोलन जेन झी म्हणजे आजच्या तरूण पिढीसाठी आहे. कोणत्याही राजकिय पक्षाने याला बाहेरून पाठिंबा दिला तर त्याचे स्वागतच आहे. परंतु आम्ही कोणत्याही राजकिय पक्षाशी आघाडी किंवा युती करणार नसल्याचे ते म्हणाले.

### इंडिया आघाडीच्या

परिस्थिती, बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि इतर जनतेच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी केली.

एसआयआर, मतचोरी आणि निवडणुकांमधील फेरफार यांबाबत सरन्यायाधीशांना पत्र पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. हे पत्र लवकरच त्यांना पाठवले जाईल. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, नीट आणि सीबीएसई परीक्षा दिलेल्या लाखो विद्यार्थ्यांचा विश्वासात केल्याप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा अशी मागणीही एकमताने करण्याचे बैठकीत ठरले, असे खर्गे म्हणाले. तसेच सर्व पक्षांची दर दोन महिन्यांनी बैठक होईल. संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षनेत्यांच्या कार्यालयात दररोज सकाळी बैठका घेऊन संसदेत समन्वय ठेवला जाईल. इंडिया आघाडीतील सर्व पक्षांची बैठक दर दोन महिन्यांनी होईल, असे ठरले होते. त्याप्रमाणे आघाडीची पुढची बैठक ऑगस्ट महिन्यात हैदराबाद येथे होईल, असेही खर्गे यांनी सांगितले. इंडिया आघाडीची बैठक २५ पक्षांतील नेत्यांच्या उपस्थितीत पार पडली. सर्वांनी आपले मते मांडले. यावेळी आम्ही पाच मुद्द्यांवर सहमती दर्शवली. हे मुद्दे घेऊन आम्ही लढा देऊ आणि पुढे जाऊ, असेही त्यांनी सांगितले. इंडिया आघाडीच्या बैठकीला काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव आदी प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. उद्धव ठाकरे आणि हेमंत सोरेन या बैठकीत आभासी (व्हर्च्युअली) माध्यमातून सहभागी झाले. त्यांनी या बैठकीत आपली मते मांडली. आम्ही बैठकीत घेतलेल्या निर्णयावर त्यांनी सहमती दर्शवली असल्याचे खर्गे यांनी स्पष्ट केले. या बैठकीपूर्वी समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी एकजूट राखण्याचे आवाहन केले. इंडिया आघाडीचे लक्ष २०२७ मधील उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांवर आहे. त्यासाठी बंधुभावाचे नाते तयार झाले पाहिजे आणि त्यासाठी आमचा प्रयत्न राहील. उत्तर प्रदेशात नेमकं काय घडत आहे? हे तुम्ही पाहतच आहात. आता महिलाही सरकारवर नाराज आहेत. यामुळे लोकशाहीची मूल्ये जपणूक करणे आवश्यक आहे, असे यादव म्हणाले. तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे की, भारतावर आर्थिक संकट आले आहे. देशात महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराचा प्रश्न आहे.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ९ जून २०२६



## शेख जाकेर महेबुब यांना पुरस्कार जाहीर!

बीड (प्रतिनिधी)बीड जिल्हा मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष शेख जाकेर महेबुब यांना यंदाचा मानाचा 'मुस्लिम ओबीसी समाजभूषण नेतृत्व पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने त्यांच्या नावाची एकमुखाने अधिकृत घोषणा केली आहे.साप्ताहिक युवा लोकमित्र' आणि 'युवा लोकमित्र परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय, आदर्शवत व प्रदीर्घ कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. निवड समितीने समाज संघटन, वंचित घटकांचे कल्याण आणि समाजाला खंबीर नेतृत्व देण्याच्या क्षेत्रातील योगदानासाठी शेख जाकेर महेबुब यांची या विशेष पुरस्कारासाठी निवड केली आहे.

# सामाजिक सलोखा जपण्यासाठी गाईला राष्ट्रीय पशू घोषित करा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने-डॉ. गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

देशहित, शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण तसेच सामाजिक व धार्मिक सलोखा जपण्यासाठी गाईला राष्ट्रीय पशू घोषित करण्यात यावे, देशातील सर्व कत्तलखाने बंद करावेत, मांस निर्यातीवर बंदी घालावी आणि गोवंश हत्याबंदी कायद्याची संविधानाच्या चौकटीत निःपक्षपणे अंमलबजावणी करावी, या विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. ८) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाचे महत्त्व अधोरेखित करत गोसंवर्धन, पशुधन व्यवस्थापन आणि शेतकरीहिताचे दीर्घकालीन




धोरण राबविण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

आंदोलनात अँड .शेख शफीक भाऊ , शेख युनुस, शेख मुबीन, मुस्ताक शेख,सय्यद सादेक,रामधन जमाले,, हनुमान घोडके,भीमराव कुटे, बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, सरफराज खान, प्रा.ज्ञानेश्वर राऊत, अमर शेख,सय्यद अब्दुल करीम,आदी सहभागी झाले होते. देशहित, शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक व धार्मिक सलोखा राखण्यासाठी गाईला राष्ट्रीय पशू घोषित करावे.देशातील सर्व कत्तलखाने सरसकट बंद करण्यात यावेत. विदेशात होणाऱ्या मांस निर्यातीवर बंदी घालण्यात यावी. गोवंश हत्याबंदी कायद्याची संविधान व कायद्याच्या चौकटीत निःपक्षपणे अंमलबजावणी करावी. मांस व्यवसाय व मांस निर्यात क्षेत्रात कार्यरत उद्योगांसाठी एकसमान व पारदर्शक धोरण लागू करावे. गोवंश हत्याबंदी कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान कोणत्याही समाजघटकाला लक्ष्य न करता सर्वांना समान व निःपक्ष न्याय द्यावा.पशुधन व्यवस्थापन, गोसंवर्धन, दुग्धव्यवसाय, सेंद्रिय शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे दीर्घकालीन धोरण राबवावे. आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

## संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी अर्ज करावेत



बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी समाजकल्याण विभागाने पुढाकार घेतला आहे.

समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तरी पात्र आणि इच्छुक विद्यार्थ्यांनी ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी अर्ज करावेत तसेच वसतिगृहाशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांमध्ये मिळून २० शासकीय वसतिगृहे सध्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहेत. यामध्ये बीड, माजलगाव, केज, पाटोदा, परळी वैजनाथ, गेवराई, आष्टी, धारूर, वडवणी आणि अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी २ वसतिगृह चालविले जातात. या सर्व वसतिगृहांची एकूण प्रवेश क्षमता २ हजार विद्यार्थ्यांची असून, यामुळे दुर्गम भागातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर होणार आहे. प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना निवास आणि भोजनाची व्यवस्था मोफत दिली जाईल. शालेय वह्या, पुस्तके आणि स्टेशनरीचे विनामूल्य वाटप करण्यात येईल. जिल्हा पातळीवरील विद्यार्थ्यांना दरमहा ६०० रुपये, तर तालुका पातळीवरील विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये भत्ता थेट दिला जाईल. मुख्य अट: विद्यार्थ्याचे आई-वडील अधिकृत ऊसतोड कामगार असणे आवश्यक आहे.

चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील यादीतील आपापल्या तालुक्याच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहाच्या ठिकाणी थेट संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत, असेही समाजकल्याण विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## नियमांचे पालन करा; प्रवाशांचा विश्वास जिंका

### जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षकांकडून रिक्षाचालक संघटनांना मार्गदर्शन




बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रिक्षाचालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांची भेट घेऊन रिक्षा व्यवसायाशी संबंधित तसेच पार्किंग यासह विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी वाहतूक अधिकाऱ्यांनी रिक्षाचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या. रिक्षाचालकांनी गणवेश (ड्रेसकोड), अधिकृत बिल्ला (बॅच) आणि लायसन्स बाळगणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले.

बैठकीत शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी रिक्षाचालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले व प्रवाशी उतरण्यासाठी शहर वाहतूक चौकीच्या डाव्या बाजूला रोडच्या खाली प्रवासी उतरणे बाबत आणि बसस्टँण्डसमोरील स्काऊट भवनच्या समोर रोडच्या खाली प्रवासी उतरणेबाबत सूचना दिल्या. नियमांचे पालन करणाऱ्या रिक्षाचालकांमुळे प्रवाशांमध्ये विश्वास निर्माण होतो आणि वाहतूक व्यवस्थेची प्रतिमा उंचावते, असे मत जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील व्यक्त केले.महाराष्ट्र रिक्षा पंचायत अध्यक्ष सुग्रीव शिंदे सचिव संजय जावळे, बीड जिल्हा परमिट मालक चालक ॲटोरिक्षा युनियनचे संस्थापक अध्यक्ष अरुण कळसकर, जिल्हाध्यक्ष भागवत गायकवाड, शहिद भगतसिंह ॲटोरिक्षा युनियनचे अध्यक्ष शेख सलीम रईस यांच्यासह इतर १५० ते २०० रिक्षाचालक उपस्थित होते यावेळी रिक्षाचालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्याची ग्वाही दिली. भविष्यात संघटनेच्या सर्व सदस्यांना नियमांची माहिती देऊन शिस्तबद्ध व सुरक्षित रिक्षा सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी सांगितले. या भेटीवेळी संघटनेचे पदाधिकारी, रिक्षाचालक व जिल्हा वाहतूक शाखेचे कर्मचारी उपस्थित होते.

## जय भवानी महाविद्यालयात ऑक्सिजन पार्कने केले पर्यावरणाचे संरक्षण

### प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण दिन उत्साहात साजरा!

पाटोदा: । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात पर्यावरण दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि पाटोदा वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २०२४ मध्ये उभारण्यात आलेले 'ऑक्सिजन पार्क' आज महाविद्यालयाच्या परिसरात पर्यावरणाचे संरक्षण करणारे प्रमुख केंद्र बनले आहे.

पाटोदा हा भाग अत्यंत दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. अशा कठीण परिस्थितीतही महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा



योजना विभागाने गेल्या १० वर्षांत अविरत परिश्रम घेतले आहेत. महाविद्यालयाच्या परिसरात: ऑक्सिजन पार्क आणि बॉटनिकल गार्डनची यशस्वी निर्मिती करण्यात आली आहे. विविध प्रकारच्या २ ते २.५ हजार झाडांची लागवड करून त्यांचे यशस्वी संवर्धन करण्यात आले आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रम राबवले जातात. संयुक्त प्रयत्नांना मोठे यश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि पाटोदा वनविभाग यांनी एकत्र येत या ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली होती. आज या पार्कमुळे महाविद्यालयाच्या सौंदर्यात प्रचंड भर पडली आहे. च्या स्वयंसेवकांनी केवळ झाडे लावली नाहीत, तर त्यांचे योग्य संगोपन करून पर्यावरण संरक्षणात मोलाचे योगदान दिले आहे. ''झाडांचे केवळ रोपण न करता त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. महाविद्यालयातील हे ऑक्सिजन पार्क केवळ निसर्गाचे रक्षण करत नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव जागृत करत आहे.'' विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू या स्तुत्य उपक्रमामुळे आज महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर अत्यंत निसर्गरम्य आणि नयनरम्य दिसत आहे. हा परिसर आता महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी मुख्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल व पर्यावरण संवर्धनाच्या अद्भूत कार्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर आणि प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे सर तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संपूर्ण परिसरात भरभरून कौतुक होत आहे.

## पर्यावरण रक्षण ही सर्वांची नैतिक जबाबदारी- माजी आ. राजेंद्र जगताप

बीड । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत बीड मधील नामांकित स्वातंत्र्य सेनानी रामराव आवगावकर विधी महाविद्यालयाच्या वतीने आज वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढीला सुरक्षित निसर्ग वारसा देण्यासाठी या उपक्रमाद्वारे वृक्षारोपणाचा संदेश देण्यात आला.

या वृक्षारोपनाला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजेंद्र जगताप साहेब, माजी मंत्री सुरेशराव नवले साहेब, माजी आमदार जनार्दन तुपे साहेब व माजी आमदार सिराजुद्दीन देशमुख साहेब हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करत उपस्थितांनी निसर्ग संवर्धनाचा आदर्श संकल्प केला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना माजी आमदार राजेंद्र जगताप साहेब म्हणाले की, ''पर्यावरण रक्षण करणे हे केवळ सरकारचे काम नसून, ही प्रत्येक सुजाण नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. आपण सर्वांनी निसर्गाशी मैत्री करून आपली पृथ्वी सदाहरीत ठेवली



ठेवली पाहिजे.'' महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान यांनीही वृक्षारोपणाचे महत्त्व विषद करून , झाडे लावण्याबरोबरच लावलेल्या झाडाचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले. हा वृक्षरोपण उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक मुळीक सर, कर्मचारी दिलीप बच्चेवाड, दत्तात्रय निपटे, नामदेव काशीद, गणेश जोगदंड, मयूर नवले यांनी विशेष परिश्रम घेतले. पर्यावरण रक्षणासाठी महाविद्यालयाने राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## प्रदेश उपाध्यक्षपदी बालाजी इंगोले यांची निवड

बीड । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर वेळोवेळी आवाज उठविणारे युवा नेते बालाजी इंगोले यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या बालाजी इंगोले यांनी यापूर्वी किसान सभेच्या जिल्हा कार्यकारिणीवर विविध पदांवर काम केले आहे. शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.



त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुंबई येथील पक्षाच्या कार्यालयात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरने, महिला व बालकल्याण मंत्री अदिती ताई तटकरे, किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष ॲडव्होकेट वसंत मनकर, सरचिटणीस गणेश डोगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत बालाजी इंगोले यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी बीड जिल्हा कार्याध्यक्ष बंडूभाऊ जटाळ, जयराज डावकर, सुनील चौधरी, हर्षद अचरेकर आदींची उपस्थिती होती. राज्यातील तसेच जिल्ह्यातील पक्षाचे वरिष्ठ नेते, माजी मंत्री धनंजय मुंडे, पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयराज पंडित, आमदार प्रकाशदादा सोळंके, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा व राज्य पातळीवर काम करून पक्ष तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार बाळाजी इंगोले यांनी यावेळी व्यक्त केला.

## मयत व्यक्तीला कागदोपत्री जिवंत दाखवले प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करा- कुलदीप करपे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा कळस गाठणारी घटना समोर आली आहे. मयत व्यक्तीला कागदोपत्री जिवंत दाखवून बोगस दस्तऐवजांच्या आधारे वडिलोपार्जित जमीन व बोअरवेल हडपण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी क्रांतिकारी शेतकरी संघटनचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी तत्कालीन मंडळ अधिकारी लहू भीमराव केदार व तत्कालीन तलाठी शरद जानकीराम राठोड यांच्यावर तात्काळ निलंबन व फौजदारी कारवाईची मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मौजे वाघोली ता. धारूर येथील रहिवासी कै. आबासाहेब बाबुराव गव्हाणे यांचे दि. १८/०९/२०२१ रोजी निधन झाले असून सह दिवाणी न्यायाधीश, धारूर यांनी दि. १४/१२/२०२१ रोजी वारसा प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. मात्र, वाघोली येथील सर्व्हे नं. २४६ मधील ६१ गुंठे वडिलोपार्जित जमीन ही कै. आबासाहेब व त्यांचे भाऊ मधुकर बाबुराव गव्हाणे यांच्या सामायिक मालकीची असून त्यात सामायिक बोअरवेल आहे.मूळ तक्रारदार मधुकर गव्हाणे यांच्या धारूर पोलिस ठाण्यात दि.५ जून २०२६ रोजी दिलेल्या तक्रारी नुसार , पुतण्या अशोक आबासाहेब गव्हाणे याने वडिलोपार्जित जमिनीतील व बोअरवेल मधील कायदेशीर हिस्सा हडपण्यासाठी मुद्रांक विक्रेता, नोटरी वकील, तलाठी व मंडळ अधिकारी,साक्षीदार यांच्या संगनमताने कट रचला: दि. १०/०७/२०२४ रोजी मयत आबासाहेब गव्हाणे यांच्या नावाने हस्ते खुद्द असे लिहून मुद्रांक विक्रेते आर. एन. मोरे यांच्याकडून १०० रु. चा बॉण्ड खरेदी केला. त्यावर मयत व्यक्तीची इंग्रजी स्वाक्षरी दाखवली. त्याच दिवशी नोटरी ॲड. मंगल एच. नेहरकर यांनी कोणतीही शहानिशा न करता मयत व्यक्तीच्या नावाने बोअरवेल नोंदीसाठी शपथपत्र नोटरी केले. तत्कालीन तलाठी शरद जानकीराम राठोड यांनी दि. १८/०७/२०२४ रोजी मयत व्यक्तीच्या नावाचा अर्ज स्वीकारला. अर्जावर इंग्रजीत स्वाक्षरी असून वर दि. १७/०७/२०२४ व खाली दि. १८/०७/२०२६ अशा विसंगत तारखा आहेत. तत्कालीन मंडळ अधिकारी लहू भीमराव केदार यांनी दि. २७/०८/२०२४ रोजी कोणतीही शहानिशा न करता फेरफार क्र.१०८२ मंजूर केला. यामुळे मुळ तक्रारदार मधुकर बाबुराव गव्हाणे यांचा बोअरवेलमधील कायदेशीर हिस्सा संपुष्टात आला.

तत्कालीन मंडळ अधिकारी लहू केदार व तलाठी शरद राठोड यांची सखोल खातेनिहाय चौकशी करून तात्काळ निलंबित करण्यात यावे. या दोन्ही अधिकाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम लोकसेवकाने खोटा दस्त तयार करणे अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश धारूर पोलीस ठाण्यास द्यावेत. मुद्रांक विक्रेता आर. एन. मोरे यांचा परवाना रद्द करावा नोटरी ॲड. मंगल एच. नेहरकर यांचा नोटरी परवाना रद्द करण्यासाठी भारत सरकारकडे शिफारस करावी.फेरफार क्र. १०८२ तात्काळ रद्द करून पूर्वीची स्थिती कायम करावी. महसूल विभागातील अधिकाऱ्यांनीच मयताला जिवंत दाखवून जमीन हडपण्यास मदत करणे हा नीचपणाचा कळस आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी अशा प्रकारे बळकावल्या जात असतील तर सामान्य शेतकऱ्याने न्याय कुणाकडे मागायचा? ७ दिवसात आरोपी अधिकाऱ्यांचे निलंबन झाले नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडू असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी दिला आहे.

## पाटोदा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीची घोषणा; अध्यक्षपदी नितीन अडागळे



पाटोदा । प्रतिनिधी

येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती (२०२६) च्या नूतन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. अत्यंत उत्साही वातावरणात पार पडलेल्या बैठकीत आगामी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यासाठी सर्वानुमते विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. या निवडीनुसार समितीच्या अध्यक्षपदी नितीन अडागळे यांची, तर उपाध्यक्षपदी विजय अडागळे व चेतन जावळे यांची निवड करण्यात आली आहे.

नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे: अध्यक्ष: नितीन अडागळे उपाध्यक्ष: विजय अडागळे, चेतन जावळे सचिव: निखील अडागळे सहसचिव: संदीप जोडेकर कोषाध्यक्ष: सुरज जावळे संघटक: सुनिल चव्हाण सहसंघटक: बाळू अडागळे सल्लागार / सहअध्यक्ष: प्रणय गायकवाड, रोहीत हराळ सदस्य व इतर सहकारी: समितीमध्ये रवी अडागळे, राहुल जावळे, आनंद कोळगे, अमोल अडागळे, सुशिल थोरात, सुशिल अडागळे तसेच गणेश पाडुळे, सागर अडागळे आणि ऋषिकेश जावळे यांचा समावेश करण्यात आला आहे. या नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल पाटोदा परिसरातील सर्व स्तरातून आनंद व्यक्त केला जात असून, नूतन पदाधिकाऱ्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

आगामी काळात ही समिती महामानव साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती अत्यंत शिस्तबद्ध आणि वैचारिक पद्धतीने साजरी करण्यासाठी प्रयत्नशील राहील, असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्षांनी व्यक्त केला. यावेळी मार्गदर्शक म्हणून सभापती किशोर अडागळे. ड्रा नरेंद्र जावळे. अरविंद सरोदे यांची निवड करण्यात आली यावेळी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

cmyk

# राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा होणार

## मंत्री मुश्रीफांची माहिती, विरोधकांवर टीका

कोल्हापूर / प्रतिनिधी

कर्जमाफीच्या मुद्यावरुन विरोधकांकडून सरकारवर टीका होत आहे. यावर मंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विरोधकांचं सरकारवर टीका करणं हे काम आहे. सरकारने दिलेल्या कर्जमाफीबद्दल विरोधक चांगलं बोलणार नाहीत असे मुश्रीफ म्हणाले. शेतकऱ्यावरुन, लाडक्या बहिणी वरुन विरोधकांना टीका करावी लागते, ते त्यांचं काम आहे. आपल्या सरकारने चार वेळेस कर्जमाफी दिलेली आहे, असे मुश्रीफ म्हणाले. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या फायदा होणार असल्याचे ते म्हणाले. लाडक्या बहिणीमुळे शासनाच्या तिजोरीवर बोजा आहे असकही ते म्हणाले.



बियाणा संदर्भात शेतकऱ्यांना कुठलीही अडचण आली तर त्या संदर्भात कंपन्यांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती मुश्रीफ यांनी दिली. कृषी सेवा केंद्रवर कारवाई होणार नाही. मंत्रिमंडळात स्पष्टपणे निर्णय घेतला आहे की लिंकिंग कंपन्या करतात कृषी सेवा केंद्र नाही त्यामुळे दोषी कंपन्या राहतील असे मुश्रीफ म्हणाले. राज्यातील शेतकऱ्यांना जून महिन्यात गुडन्यूज मिळेल, शेतकरी कर्जमाफीचा निर्णय जून महिन्यात घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. त्यानुसार, मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी कर्जमाफीचा निर्णय झाला असून, सहकार विभागाकडून अटी व शर्तीनंतर कर्जमाफी केली जाणार आहे. दोन लाख रुपयांच्या मर्यादेत अनेक शेतकऱ्यांना लाभ मिळणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेवर मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल मुख्यमंत्र्याकडे सादर केल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत योजनेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार, दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सरकार माफ करणार आहे. तर नियमित पिक कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे.

## खरीप ज्वारी लागवडीचे नियोजन

यंदाच्या कमी पावसाच्या दृष्टीने ज्वारीची लागवड करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. परंतु कमी पावसाच्या दृष्टीने योग्य लागवड, पेरणी, खत आणि आंतरमशागत करणेही तितकेच आवश्यक आहे. कारण चुकीच्या लागवड नियोजनामुळे उत्पादनात मोठी घट पाहायला मिळते. त्यामुळे ज्वारी संशोधन केंद्र आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठाने ज्वारीच्या लागवड तंत्राची शिफारस केली आहे.

पूर्वमशागत :ज्वारीच्या लागवडीसाठी अगोदरच्या पिकानंतर कुळवाची किंवा वखराची खोल पाळी द्यावी. त्यानंतर २ ते ३ वेळा वखराच्या पाळ्या द्याव्यात. शेवटच्या पाळीपूर्वी ५ ते ६ टन प्रती हेक्टरी शेणखत जमिनीत मिसळावे.

पेरणी :ज्वारीची पेरणी मॉन्सूनचा चांगला पाऊस झाल्यावर मातीला वाफसा आल्यावर लवकर करावी. २० जून ते ७ जुलैच्या दरम्यान करावी. लवकर पेरणी केल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव कमी होतो. ज्वारीची पेरणी तिफणीने किंवा दोन चाड्याच्या पाभरीने करावी. ज्वारीच्या दाण्यांचा आकार लहान असल्याने त्याची पेरणी २ ते ३ सेंमी खोलीवर करावी. दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी आणि दोन रोपातील अंतर १५ सेंमी इतके ठेवावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी ७ ते १० किलो बियाणे लागते.

खत व्यवस्थापन :ज्वारी हे तृणधान्य पीक असल्याने ते अन्नद्रव्यांच्या बाबतीत ते खादाड असते. ज्वारीला हेक्टरी ८०:४०:४० चा नत्र, स्फुरद, पालाशचा डोस द्यावा. यामध्ये ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० पालाश लागवडीवेळी द्यावे. आणि पेरणीनंतर ३० दिवसांनी नत्राची उरलेली मात्रा द्यावी. या मात्रेसाठी सरळ खतांचा वापर केल्यास ८७ किलो युरिया, २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट, आणि ८० किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे आणि ३० दिवसांनी पुन्हा ८७ किलो युरिया प्रति हेक्टर द्यावा. रासायनिक खतांमध्ये मिश्र खतांचा वापर करायचा असेल तर २०:२०:० हे मिश्र खत २०० किलो आणि म्युरेट ऑफ पोटॅश हे खत ६७ किलो पेरणीच्या वेळी देऊ शकतात.

पाणी व्यवस्थापन :ज्वारीच्या पिकाला त्याच्या संवेदनशील काळात पाणी देणे अत्यंत आवश्यक असते. जसे पिकाचा वाढीचा काळ, पीक पोटरीत येण्याचा काळ, फुलोऱ्यात येण्याचा काळ आणि दाणे भरण्याची अवस्था या चार अवस्थेत पाणी देणे गरजेचे असते.

आंतरमशागत :ज्वारी पिकासाठी पेरणीनंतर ३,५ व ८ व्या आठवड्यानंतर कोळपणी करावी. तर पहिली विरळणी पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी आणि दुसरी विरळणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी करावी. तण नियंत्रणासाठी खुरपणी आणि कोळपणी पीक पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांपूर्वीच करावी.

आंतरपीक :यंदा कमी पाण्याच्या दृष्टीने आंतरपीक फायदेशीर ठरु शकतात. त्यामुळे ज्वारीसोबत तूर हे आंतरपीक घ्यावे. यात (२:१) म्हणजेच दोन ओळी ज्वारीच्या आणि १ ओळ तुरीची लावावी. किंवा २ ओळी तुरीच्या आणि १ ओळ ज्वारीची लावावी.



## कोंबड्यांमध्ये आढळणारा जीवघेणा आजार 'पांढरा अतिसार'



ग्रामीण अर्थव्यवस्थेत कुक्कुटपालनाला विशेष महत्व आहे, कारण अनेक लोकांसाठी कमाईचे मुख्य साधन देखील आहे. कुक्कुटपालनात कोंबड्या आजारी पडल्याने या व्यवसायाला आणि पर्यायाने कुक्कुटपालकांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. असाच एक जीवघेणा आजार म्हणजे 'पांढरा अतिसार/ जुलाब'. या रोगाला पांढरी हगवण किंवा पुलोरम या नावाने सुद्धा ओळखतात.

पांढरा अतिसार रोग म्हणजे काय? या आजारात कोंबड्यांच्या विष्ठेचा रंग पूर्णपणे पांढरा होतो आणि शौच करताना त्यांना खूप वेदना होतात. काही वेळा पांढऱ्या जुलाबाच्या आजाराने काही पक्षी आंधळे किंवा पांगळे होतात. जुलाबामुळे कोंबड्या आणि पिल्लांचा मागचा भागही चिकट होतो. पांढरा अतिसार किंवा जुलाब हा रोग प्रामुख्याने पिलांमध्ये होतो, यामुळे बहुतेक पिल्ले मरतात. नंतर हा रोग कोंबड्यांमध्ये पसरतो. या रोगाची लागण झालेल्या अंड्यांमधील भ्रूण मरतात.

पांढरा अतिसार रोग उपचार : कोणत्याही पशुवैद्यकीय दुकानात तुम्हाला पांढऱ्या अतिसाराचे औषध सहज मिळू शकते. कोंबड्या आणि पिल्लांनाही त्यांच्या डोसनुसार औषध द्यावे. जर तुम्ही ५ कोंबड्यांना किंवा २० पिलांना औषध देत असाल तर २ चिमूटभर औषध एका कप पाण्यात विरघळवून घ्या आणि आजारी पिलांना २-२ थेंब आणि कोंबड्यांना ५-५ थेंब सिरिंजद्वारे सलग तीन दिवस द्या. असे केल्याने डोस ओव्हरडोस होत नाही आणि त्यांचा आरामही लवकर येतो.पाण्यात विरघळवून औषध देणे : पांढऱ्या अतिसाराच्या आजारापासून मुक्त होण्यासाठी तुम्ही तुमच्या कोंबड्या किंवा पिल्लांना त्यांच्या पिण्याच्या पाण्यात विरघळवून औषध देऊ शकता. या पद्धतीने ४० पिल्ले किंवा १० कोंबड्या एका वाटीत पाण्यात सुमारे ४ चिमूटभर औषध विरघळवून कोंबड्याच्या घरात ठेवावे. हे औषध असलेले पाणी तुम्ही कोंबडीच्या पाण्याच्या भांड्यात सलग २ दिवस ठेवावे. याशिवाय, गरजेनुसार सुद्धा हे औषध असलेले पाणी प्रभावित पिलांना किंवा कोंबड्यांना पाजावे लागेल. पांढरा अतिसार रोग प्रतिबंध : पांढऱ्या जुलाबाच्या आजारापासून कोंबड्यांना आणि पिल्लांचे संरक्षण करण्यासाठी, तुम्ही कोंबड्याच्या घरामध्ये आणि आजूबाजूला स्वच्छता राखली पाहिजे. याशिवाय, कोंबड्यांना आणि पिलांना कमीत कमी प्रमाणात टेट्रासाइक्लिन पावडर/लिक्सेन पावडर/फुरासोल पावडर देऊन हा धोकादायक आजार टाळता येतो.

## कृषी यंत्रे- उपकरणे खरेदी करण्यापूर्वी अशी घ्या काळजी

शेतीच्या विकासामध्ये शेती उपकरणे आणि यंत्रे अतिशय महत्वाची भूमिका बजावतात. त्यांची योग्य ती निवड केल्याने वेळेची बचत होते, उत्पादनात वाढ होते आणि खर्च कमी होतो. मात्र, बाजारात विविध कंपन्यांची अनेक उपकरणे उपलब्ध असल्याने त्यांची निवड करणे कठीण असते. खरेदी करताना काही खास गोष्टींची काळजी घेतली नाही तर पुढे अडचणी येऊ शकतात.

शेताचे क्षेत्रफळ आणि जमीन प्रकार :सर्वप्रथम आपल्या शेताचे क्षेत्रफळ आणि जमीन प्रकार, जसे की जमीन चिकण, काळया मातीची, मुरमाड आहे का, याची माहिती असणे आवश्यक आहे. मोठ्या शेतांसाठी मोठ्या क्षमतेची यंत्रणा लागेल, तर लहान शेतांसाठी लहान यंत्रे पुरेसे होतील. जमीन चिकण असेल तर हलक्या यंत्रांचा विचार करावा.

पिकांच्या लागवडीचे नियोजन :वेगवेगळ्या पिकांसाठी वेगवेगळी यंत्रणा लागते. जसे धान्यासाठी पेरणी यंत्र, वीडर, हार्वेस्टर वैगेरे; तर ऊसासाठी बेणे टोचण आणि कापणी यंत्र इत्यादी. आपण कोणती पिके घेणार आहात त्यानुसार यंत्रसामग्री व उपकरणे निवडा.

शेतीच्या यंत्राविषयी योग्य माहिती :तुम्ही कोणते साधन वापरणार आहात आणि त्यातून कोणते फायदे होतील, हे तुम्हाला माहिती व्हावे. त्यासाठी तुम्हाला अगोदरच बाजारात मिळणारी कृषी यंत्रांची प्राथमिक माहिती करून घेणे आवश्यक आहे. आजूबाजूला संबंधित शेती यंत्रे वापरणारे शेतकरी



असतील, त्यांना जरूर भेटा, त्यांचा अनुभव जाणून घ्या. तुम्हाला फायदा-तोट्याची योग्य प्राथमिक माहिती नसल्यास, तुम्ही यंत्रसामग्रीबाबत समाधानकारक निर्णय घेऊ शकणार नाही.

गुणवत्ता आणि टिकाऊपणा :शेती उपकरण आणि यंत्रे खरेदी करताना त्यांची गुणवत्ता आणि टिकाऊपणा याकडे लक्ष द्या. विश्वासार्ह, परिचित अशा नामांकित कंपन्यांची यंत्रे निवडणे चांगले, कारण त्यांची स्पेअर पार्ट्स सहज उपलब्ध होतात आणि वारंवार दुरुस्तीची गरज पडत नाही.

यंत्राची माहिती आणि गुणवत्ता प्रमाणपत्र :आपण ज्या यंत्राची खरेदी करत आहात, त्याची तपशीलवार माहिती (हॉर्सपॉवर, क्षमता, इत्यादी) आणि गुणवत्ता प्रमाणपत्र ( किंवा इतर मान्यताप्राप्त संस्था) याची माहिती जाणून घ्या. त्यामुळे यंत्राची कार्यक्षमता आणि टिकाऊपणा यांची खात्री करता येते. नेहमी प्रमाणित यंत्रे आणि उपकरणे यांची खरेदी करावी.

ब्रँड आणि मॉडेल : एकट्या मशीनच्या दिसण्यावर कधीही अवलंबून राहू नका. फार्मट्रॅक, फिल्डकिंग, सोनालिका किंवा महिंद्रा यांसारख्या प्रतिष्ठित उत्पादकाकडून शेतीचे यंत्र खरेदी करा. तुमच्या गरजा पूर्ण करणाऱ्या सर्वोत्तम वैशिष्ट्यांसह सर्वात अलीकडील मॉडेल शोधा. तुम्ही खरेदी करू इच्छित असलेली शेती मशिनरी चालवण्यासाठी जास्त श्रम किंवा ऊर्जा लागत नाही. जास्त तास काम करू शकणारे फार्म मशीन निवडताना त्याचे अष्टपैलुत्व आणि सहनशक्ती विचारात घ्या. इतर घटकांमध्ये फार्म मशीनची मूळ किंमत, अंदाजे सेवा वर्ष आणि इतर समाविष्ट आहेत.डेमो आणि ट्रेनिंग :काही यंत्रे वापरण्यासाठी थोडीशी जटिल असू शकतात. म्हणून खरेदी करताना विक्रेत्याकडे त्या यंत्राचे डेमो मागवा आणि ते चालविण्यासाठी थोडे प्रत्यक्ष फील्ड ट्रेनिंग घ्या.

वॉरंटी आणि हमी : यंत्राची वॉरंटी आणि हमी काय आहे, याची माहिती घ्या. वॉरंटी कालावधीत यंत्र बिघाड झाल्यास दुरुस्ती किंवा बदलणीसाठी कंपनी जबाबदार असते. नेहमी बिल घेऊनच कोणतीही खरेदी करावी. शिवाय, वॉरंटी कार्ड डिलरच्या सही-शिक्क्यानिशी भरून घ्यावे. अलीकडे, वेबसाईटवर ऑनलाईन प्रॉडक्ट रजिस्ट्रेशनची सोय असते. तेही करून घ्यावे. तुमच्या यंत्राचे पुनर्विक्री मूल्यही (रिसेल व्हॅल्यू) खरेदी करताना नक्की जाणून घ्या.

## दिन विशेष

**जागतिक दिवस**
**बॉलपॉईंट पेन दिवस**
**जागतिक दृष्टीदान दिन.**

### महत्वाच्या घटना

१७६८ : माधवराव पेशवे आणि राघोबादादा यांच्यामधे धोडपची लढाई झाली. त्यात राघोबादादा पराभूत झाला.
१९१८ : पहिले महायुद्ध - इटलीच्या छोट्या मोटारबोटीने टोरपेडो मारुन हंगेरीची बॅटलशिप एस.एम.एस. इस्तवान बुडवली.
१९२४ : इटलीच्या समाजवादी नेता ज्याकोमो मॅट्टेओटी यांची हत्या.
१९३५ : ॲक्रन, ओहायो येथे बॉब स्मिथ व बिल विल्सन यांनी 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस' या संस्थेची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध - नॉर्वेने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : दुसरे महायुद्ध - इटलीने फ्रान्स व इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४४ : ओराद्-सुर-ग्लेनची कत्तल, स्त्री बालकांसह ६४२ व्यक्तींची हत्या.
१९६६ : 'मिग' या जातीच्या विमानांची नाशिक येथे निर्मिती.
१९७७ : ॲपल कॉम्प्युटर्सने आपला 'ॲपल-' हा संगणक विकण्यास सुरूवात केली.
१९८२ : पासून दृष्टीदिन महाराष्ट्र राज्यात साजरा केला जातो.
१९९९ : उस्ताद झाकीर हुसेन यांची अमेरिकेतील प्रतिष्ठाप्राप्त 'नॅशनल हेरिटेज गौरववृत्ती' साठी निवड
२००३ : स्पिरिटरोव्हर मंगळाकडे रवाना.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१३ : फख्रुद्दीन 'इराकी' पर्शियन तत्त्वज्ञ
१८७३ : स्वामी विराजनंदा - भारतीय तत्ववेत्ता,लेखक
१८९० : भारतीय सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न सन्मानित भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता व राजकारणी तसचं, आसाम प्रांताचे शेवटचे पंतप्रधान व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचा जन्मदिन.
१९०६ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर - गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. (मृत्यू: २० सप्टेंबर १९०९ पोरबंदर, सौराष्ट्र, गुजरात)
१९०८ : भारताचे लष्करप्रमुख, हैदराबादचे लष्करी प्रशासक व भारताचे कॅनडातील राजदूत, पद्मविभूषण जनरल जयंतीनाथ चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: ६ एप्रिल १९८३)
१९१५ : सौल बेल्लो - नोबेल पारितोषिक विजेते लेखक
१९१६ : डंचिन डोनट्स चे स्थापक विल्यम रोसेनबर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर २००२)
१९२४ : के. भालचंद्र - नेत्रशल्यविशारद (मृत्यू: १९८९)
१९३८ : राहुल बजाज - बजाज उद्योग समूहाचे प्रमुख.
१९३८ : भारतीय गणितज्ञ आणि शैक्षणिक वासंती एन. भाट नायक यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००९)
१९५५ : वेद प्रकाश शर्मा - भारतीय लेखक
१९५५ : प्रकाश पदुकोण - ऑल इंग्लंड चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला बॅडमिंटनपटू
१९५८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यिक व समाजसेवक अनुप सेठी यांचा जन्मदिन.
१९६० : नंदामुरी बालकृष्णा - भारतीय चित्रपट अभिनेते, राजकीय नेते
१९७२ : प्रसिद्ध भारतीय अमेरिकन व्यावसायिक कार्यकारी अधिकारी, अल्फाबेट इंक चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गुगल चे व्यवस्थापकीय कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांचा जन्मदिन.
१९८१ : सर्वोत्कृष्ट भारतीय खेळाडूचा भारतीय खेल रत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध सुवर्ण पदक जिंकणारे पहिले भारतीय पॅराऑलम्पिक भाला फेकपटू देवेंद्र झाझरिया यांचा जन्मदिन.
२००० : जगातील सर्वोच शिखर माउंट एवरेस्ट ची मोजणी करणाऱ्या व ते शिखर केवळ एक वर्ष आणि अकरा महिन्यात सर करणाऱ्या विश्वातील पहिली युवा गिर्यारोहिका भारतीय युवा गिर्यारोहिका मालावथ पूर्णा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३६ : आंद्रे ॲम्पिअर - फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १७७५)
१८७७ : रामनाथ टागोर - भारतीय समाजसुधारक
१९०३ : लुइगी क्रेमॉना - इटालियन गणितशास्त्रज्ञ.
१९०६ : गुजराती लेखक समीक्षक गुलाब दासब्रोकर यांचे निधन.
१९४९ : सिग्रिड उंडसेत, नोबेल पारितोषिक विजेते लेखक
१९५५ : भारतीय-अमेरिकन गोल्फर मार्गारेट ॲबॉट यांचे निधन. (जन्म: १८७८)
१९५७ : भाई विर सिंघ, भारतीय पंजाबी लेखक,कवी. लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितशास्त्रज्ञ.लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितशास्त्रज्ञ.
१९७६ : पॅरामाउंट पिक्चर्स चे सहसंस्थापक ॲडॉल्फ झुकॉर यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १८७३)
१९८७ : प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता जीवन यांचे निधन.
२००१ : फुलवंताबाई झोडगे - सामाजिक कार्यकर्त्या, सावित्रीबाई फुले यांचा वारसा विसाव्या शतकातुन एकविसाव्या शतकापर्यंत नेण्याचे कार्य झोडगेअक्कांनी केले.
२००६ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर - गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.
२०१९ : गिरीश कर्नाड - ज्ञानपीठ पुरस्कार विजेते अभिनेते व दिग्दर्शक (जन्म: १९ मे १९३८)

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.९ जून २०२६ ५

# नवीन पिढी समाजाचे, देशाचे भावी निर्माते - हस्तीमल बंब

## १३८ गुणवंताचा अभिनंदन पत्र प्रदान करून सत्कार

जालना। प्रतिनिधी

१० वीं, १२ वी नंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षाणिक करिअर संधी बाबत कला, विज्ञान व वाणिज्य शाखा मधील विविध अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यां मध्ये सकारात्मक, नकारात्मक गुण असतात गुणवत्तेनुसार उच्च, सरासरी, इतर अशी विविध श्रेणी असून प्रत्येकांना स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासावर लक्ष केंद्रीत करून दोन पाऊल पुढे जाण्याच्या प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांनी ध्येय निशचित करून व्यक्तीमत्व विकासावर भर द्यावा असे नागपुर येथील देशाचे सुप्रसिध्द करिअर मोटीवेटर प्रा. डॉ. भुसारी यांनी अहवान केले. राजस्थानी समाजातील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व गुणवंताचा सत्कार समारोह दि ७ जून २०२६ रविवार रोजी, जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे अति उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन खंडेलवाल ज्वेलर्स चे प्रमुख श्री नितीन खंडेलवाल यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद श्री हस्तीमलजी बंब यांनी भूषविले. उपाध्यक्ष नरेन्द्र मोदी, कोषाध्यक्ष विजयराज सुराणा, सुदेश सकलेचा, सतिष पंच, विजय राठी, अशोक मिश्रा, अर्जुन खंडेलवाल इ. मंचावर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. दिप प्रज्वलन श्री खंडेलवाल यांच्या हस्ते कण्यात आले. पुढे बोलताना भुसारी म्हणाले विद्यार्थ्यांनी स्वतःला प्रश्न विचारावा आणि स्वतः मध्ये सकारात्मक बदल घडावा. आजच्या स्पर्धात्मक युगात उत्साह, नाविण्य आणि सकारात्मक दृष्टिकोण आवश्यक असल्याचे सांगितले.

निराश न होता उपलब्ध करिअर संधीचा लाभ घ्यावा. छत्रपति शिवाजी महाराजा सह अनेक युग पुरुष आणि माजी राष्ट्रपति अब्दुल कलाम यांच्या सारखे वैज्ञानिक घडविण्यात पालकांचे संस्कार व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरले असल्याचे नमूद करून महापुरुषाचे आदर्श अंगी करण्याचे अहवान केले. पालकांनी मुलाची सर्वांसमोर प्रशंसा करावी मात्र त्याच्या चुका व राग एकांतात समजावून सांगावेत. साईन्स, बी.एस.सी., कॉमर्स, आटर्स अनेक विषयावर सखोळ मार्गदर्शन भुसारी यांनी केले. प्रसिद्ध उद्योजक श्री खंडेलवाल यांनी बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे अहवान केले. माझे शिक्षण मर्यादित झाले असले तरी सातत्याने उद्योग, व्यावसायिक दृष्टीकोन, परिश्रमच्या जोरावर व्यवसायात यश मिळविता आले. युवकांसाठी वाचनालय होणे गरजेचे आहे. हा सर्व विधायक कामासाठी, गरजु विद्यार्थ्यांसाठी आमचे सर्व सहकार्य राहील, असे खंडेलवाल म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना बंब म्हणाले विद्यार्थी, युवक, नवीन पिढी हे समाजाचे, देशाचे भावी निर्माता आहे. त्याचे उत्साह वाढविणे आपले परम कर्तव्य आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा सद्उपयोग करून दुरउपयोग टाळावा. व्यसना पासुन दुर राहुन भविष्य उज्ज्वल करावे. आपल्या आरोग्यसाठी खेळ, योगा, व्यायाम गरजेचे आहे. या कार्यक्रमात १३८ गुणवंताना अभिनंदन पत्र प्रदान करुन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक उपस्थित राहिल्या बद्दल कौतुक करुन धन्यवाद, शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी कचरुलाल नवलखा, ताराचंद कुचेरिया, बसंतीलाल गोलेच्छा, दीपक मोदी, धनराज जैन, अशोक दहातोंडे, सुभाष सोनुने, श्री शेळके, सुखदेव बजाज, अनिल खंडेलवाल, संजय खंडेलवाल, सौ. आनंदी अय्यर, संदीप सर, हंस शाह, ज्ञानेश्वर देवकाते इ. परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार व उत्कृष्ठ सुत्र संचालन ॲड. अभय सेठिया यांनी केले.

## पतीचे अनैतिक संबंध असल्याची भीती दाखवत ५ लाखांचा गंडा

संभाजीनगर। प्रतिनिधी

घरातील संकटे दूर होतील, पतीचे कथित अनैतिक संबंध संपुष्टात येतील आणि कौटुंबिक कलह मिटेल, असे आमिष दाखवत एका भोंदूबाबाने २६ वर्षीय विवाहितेला तब्बल पाच लाख रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुख्य आरोपीसह त्याच्या साथीदारांविरुद्ध गंगापूर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

फिर्यादी सोनाली बाळासाहेब तागड (२६, रा. शिराळ चिचुंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) या सध्या भेंडाळा फाटा (ता. गंगापूर) येथे वास्तव्यास आहेत. मार्च २०२६ मध्ये त्यांच्या पतीच्या मोबाईलवरील एका व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून त्यांची ओळख कमलाकर जोशी (५०, रा. गंगापूर) याच्याशी झाली होती. सोनाली यांनी आपल्या कौटुंबिक अडचणींबाबत माहिति दिल्यानंतर आर ोपीने त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर घरात मोठे संकट असून पतीचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असल्याचे खोटे सांगून भीतीचे वातावरण निर्माण केले. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून विशेष होम-हवन विधी करावा लागेल, असे सांगत आरोपीने वेळोवेळी पैशांची मागणी केली. १० मार्च ते १ जून २०२६ या कालावधीत आरोपीच्या सांगण्यावरून सोनाली यांनी २३.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ज्यांची किंमत सुमारे २ लाख ३५ हजार रुपये आहे, तसेच ७ हजार रुपये रोख आरोपीच्या साथीदारांकडे दिले. याशिवाय फोनपे आणि बँक खात्यामार्फत २ लाख ५८ हजार रुपये आरोपीच्या खात्यात वर्ग केले. अशा प्रकारे एकूण सुमारे ५ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सोनाली यांनी गंगापूर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार कमलाकर जोशी, त्याचा मुलगा व अन्य दोन अन- ोळखी इसमांविरुद्ध शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. सपोनी विठ्ठल झांजुर्णे तपास करत आहेत. भोंदू बाब आणि त्याच्या साथीदारांनी सदर महिलेचा विश्वास संपदान करून तुमच्या वरील संकट दुर करण्याठी होमहवन करावे लागेल अशी बतावणी करत महिलेकडून सोने, चांदी, रोख रक्कम असा ५ लाखांचा गंडा महिलाला लावला. अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि खोट्या धार्मिक विधींच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक होत असल्याने अशा व्यक्तींपासून सावध राहावे, आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

## परंड्यात १ कोटी रुपये किंमतीचा गुटखा जप्त

धाराशिव। प्रतिनिधी

परंडा शहरात अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपयांचा अवैध गुटखा व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. पुणे, सोलापूर, सांगली, सातारा व धाराशिव येथील दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरीत्या ही कारवाई केली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष समाधान खुळे व त्यांचे बंधू प्रदीप खुळे यांच्या बावची चौक परिसरातील तीन गोदामांवर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत १ कोटी १ लाख ८८ हजार ५०८ रुपयांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला. तसेच दाऊद फकीर पठाण (रा. हैदर अली रोड, परंडा) यांच्या गोदामातून ७८ हजार ७५५ रुपयांचा गुटखा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी रोहित दिनेश फंदी यांनी फिर्याद दिली असून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाच्या संयुक्त पथकाने गुप्त माहितीच्या आधारे केली.

## कालबाह्य चिवडा खाल्ल्याने तरुणास विषबाधा!

### अन्न व औषध प्रशासन विभागाचे दुर्लक्ष;भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थाची सर्रास विक्री

मंठा। प्रतिनिधी

मंठा शहरात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील मा नवदुर्गा बिकानेर स्वीट मार्ट येथून खरेदी केलेला पॅकबंद फराळी चिवडा खाल्ल्यानंतर एका तरुणास विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित दुकानावर कारवाईची मागणी होत आहे. मंठा शहरात भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थाची सर्रास विक्री होत असताना अन्न व औषध प्रशासन विभागाचे दुर्लक्ष का ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. मंठा तालुक्यातील पांगरी खुर्द येथील अजय कानबा काळे (वय २३) या युवकाने संबंधित दुकानातून फराळी चिवड्याचे पाकीट खरेदी केले होते. हा चिवडा खाल्ल्यानंतर त्याची प्रकृती अचानक बिघडली. त्यानंतर त्यास तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तात्काळ उपचार सुरू केल्यामुळे या युवकाचा जीव वाचला.

दरम्यान, संबंधित चिवड्याच्या पाकिटावरील कालबाह्यता तारीख संपलेली असल्याचे समोर आले आहे. एक्सपायरी डेट संपल्यानंतरही हा माल विक्रीस ठेवल्याने नागरिकांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या घटनेनंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने तात्काळ संबंधित दुकानाची तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच शहरातील इतर दुकाने व हॉटेलांमध्येही कालबाह्य अन्नपदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. हॉटेल चालक सर्रास भेसळयुक्त खवा, बासुंदी, भेसळीच्या तेलातील पदार्थ मोठ्या प्रमाणावर विक्री करीत आहेत. ग्रामीण भागातून येणारे अनेक ग्राहक घाईगडबडीत किंवा माहितीअभावी उत्पादनावरील उत्पादन तारीख व कालबाह्यता तारीख तपासत नाहीत. याचाच फायदा घेत काही दुकानदार व स्वीट मार्ट चालक कालबाह्य झालेला माल विक्री करत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. जालना येथील अन्न व औषध प्रशासन विभागाने तात्काळ कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणूक

### ॲड वसंतराव साळुंके सलग पाचव्यांदा विजयी

बीड। प्रतिनिधी

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा सदस्य निवडणूकीत बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र ॲड वसंतराव दिगंबरराव साळुंके यांनी सलग पाचव्यांदा विजयी होण्याचा विक्रम नोंदविला आहे. सलग पाच वेळा विजयी होणारे परिषदेचे ते पहिले आणि एकमेव सदस्य आहेत.

महाराष्ट्र गोवा विधी परिषदेच्या २५ जागांसाठी २४ मार्च रोजी झालेल्या निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि.सहा) घोषित करण्यात आला. या निवडणुकीत एकूण ९२ हजार ५१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. यातील ८८ हजार ३५७ मते वैध तर ३ हजार ६९४ मते अवैध ठरली. यातून ॲड वसंतराव साळुंके यांना पहिल्या पसंतीची एक हजार ८१२ मते पडली. ४ जून रोजी पहिल्या पसंतीच्या मतांची यादी घोषित झाली. तर अंतिम निकाल शनिवारी घोषित करण्यात आला. यामध्ये त्यांना पसंती क्रमानुसार मिळालेल्या अंतिम मतांचे मूल्य ३ लाख ६९ हजार ३३० आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात ज्येष्ठ विधीज्ञ ॲड वसंतराव दिगंबरराव साळुंके हे १९८२ पासून म्हणजेच स्थापनेपासून कार्यरत आहेत. तर बार कौन्सिलवर १९९८ पासून सलग निवडून येत आहेत. २०२२३ या वर्षात परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले ॲड वसंतराव साळुंके हे बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील रहिवासी आहेत. तर त्यांचे ज्येष्ठ बंधू मोहनराव साळुंके माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. तर ॲड मयूर वसंतराव साळुंके व ॲड सुदर्शन जीवनराव साळुंके हे त्यांचा वारसा नेटाने पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दूडशेहून अधिक विधीज्ञ तयार झाले आहेत. जिल्हा न्यायाधीश तसेच जेएमएफसी, विधी अधिकारी या पदावरही अनेक जेण पोहचले आहेत. सदस्य पदी निवडून आल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदन वर्षाव होत आहे.

## कार-ऑटोची भीषण धडक; अपघातानंतर सीएनजी ऑटोचा मोठा स्फोट

लातूर। प्रतिनिधी

उदगीर-जळकोट राष्ट्रीय महामार्गावर कार आणि सीएनजी ऑटो रिक्षा यांची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातानंतर ऑटोमधील सीएनजी टाकीचा मोठा स्फोट होऊन ऑटोने पेट घेतल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत ऑटो जळून खाक झाला. ऑटो चालकाने दाखवलेल्या कमालीच्या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली असून तो मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर पडला.

याबाबत अधिक माहिती अशी, कार (क्र. एमएच २६ व्ही ३७६०) आणि सीएनजी ऑटो (क्र. एमएच १२ वायएल ४१८१) ही दोन्ही वाहनांची नळगीर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की, ऑटोमधील सीएनजी टाकीचा मोठा स्फोट झाला आणि बघता बघता संपूर्ण ऑटो आगीच्या ज्वालांच्या विळख्यात सापडला. ऑटोचालक ऑटोत एकटाच होता. धडकेनंतर तो तातडीने ऑटोतून बाहेर पडल्याने त्याचा जीव वाचला. ऑटो आगीत भस्मसात होत असताना परिसरात धुराचे मोठे लोट पसरले होते.अपघातानंतर राष्ट्रीय महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. त्यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ऑटोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. धडकेनंतर सीएनजी टाकीचा झालेला भीषण स्फोट आणि त्यानंतर लागलेली आग पाहून परिसरातील नागरिकही पुरते हादरले होते. सुदैवाने घटनेच्या वेळी ऑटोमध्ये केवळ चालक एकटाच होता. धडक होताच आग लागल्याचे पाहून परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने सेकंदाचाही उशीर न करता ऑटोमधून बाहेर उडी घेतली. काही सेकंदांचा जरी उशीर झाला असता, तर मोठा अनर्थ घडला असता. मात्र, चालकाच्या या धाडसामुळे त्याचा मृत्यूच्या दाढेतून चमत्कारिकरित्या बचाव झाला.

## १४ हजारांची लाच घेताना ग्राम महसूल अधिकारी पकडला

हिंगोली। प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील खिल्लार येथील तक्रारदाराच्या वडिलोपार्जीत जमिनीचा फेरफार करून सातबाराला लावण्यासाठी १४ हजारांची लाच घेताना ग्राम महसूल अधिकाऱ्यास शुक्रवारी रात्री ७ वाजता सेनगाव ते हिंगोली मार्गावर पुसेगाव पाटी येथे रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेनगाव तालुक्यातील खिल्लार येथील एका तक्रारदाराच्या वडिलांच्या नावे असलेली जमीन हक्कसोड वाटणीतून तक्रारदाराच्या नावे आली होती. सदर जमिनीचा फेरफार करून सातबाराला नांव लावण्यासाठी त्यांनी तलाठी सज्जा येथे अर्ज दाखल केला होता. मात्र ग्राम महसूल अधिकारी रामेश्वर रोडगे याने २२ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यावेळी रोडगे याने ८ हजार रुपयांची रक्कम घेतली. उर्वरित रक्कम देण्याची ठरले होते. या प्रकरणी तक्रारदाराने हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. यावरून पडताळणी करण्यात आली. यावेळी रोडगे याने सेनगाव येथे १४ हजार रुपये आणून देण्याचे सांगितले. मात्र त्यानंतर त्याने सेनगाव ते हिंगोली मार्गावर पुसेगाव पाटी येथे थांबल्याचे सांगत तेथे येण्याचे सांगितले. यावेळी तक्रारदाराकडून १४ हजाराची लाच घेतांना ग्राम महसूल अधिकारी रामेश्वर रोडगे यास रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपाधीक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत, शेख शकील, विजय शुक्ला, भगवान मंडलिक, राजाराम फुफाटे, रवींद्र वरणे, गोविंद शिंदे, गजानन पवार, अमोल जाधव, शिवाजी वाघ, महिला पोलिस कर्मचारी योगीता अवचार यांच्या पथकाने केली.

## गोदावरी पात्रातील वाळूमाफियांवर छापा; तीन ट्रॅक्टरसह जेसीबी जप्त

परभणी । प्रतिनिधी

गंगाखेड गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध रेती उत्खननाविरोधात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) रात्री १०.४५ वाजता मोठी कारवाई करत रेती माफियांना जोरदार दणका दिला. तालुक्यातील पिंपरी-नागठाणा परिसरात सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर धाड टाकून पथकाने तीन ट्रॅक्टर, एक जेसीबी जप्त केली. या कारवाईत एकूण ४० लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्ह्यात अवैध रेती उत्खननाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या या कारवाईने रेती माफियांच्या हालचालींना काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने रेती उपसा करून तिची वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी अनेक दिवसांपासून होत होत्या. मात्र, या व्यवसायामागे प्रभावशाली साखळी कार्यरत असल्याची चर्चा असल्याने कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तालुक्यात गस्त घालत असताना पिंपरी-नागठाणा येथील गोदा नदीपात्रात अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. यावेळी जेसीवी सहाय्याने नदीपात्रातून रेती उपसा करून ती ट्रॅक्टरमध्ये भरली जात असल्याचे निदर्शनास आले. पोलीसांनी घटनास्थळावरून तीन ट्रॅक्टर व एक जेसीबी ताब्यात घेतली. जप्त वाहनांची किंमत आणि इतर साहित्य मिळून एकूण ४० लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाचे हेडकॉन्स्टेबल माणिक वाघ यांच्या फिर्यादीवरून संबंधित ट्रॅक्टर चालक-मालक तसेच जेसीबी चालक- मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, हेडकॉन्स्टेबल महेश कवठाळे, राहुल परसोडे, माणिक वाघ, रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, पोलीस कॉन्स्टेबल शरद सावंत, दिलीप निलपत्रेवार, हनुमान ढगे, हनवते यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, एलसीबीच्या पथकाने कारवाई केल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अवैध रेती उत्खनन इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असताना स्थानिक स्तरावर त्याची माहिती नव्हती का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. तसेच पुढील काळात गंगाखेड पोलिसांकडूनही रेती माफियांविरोधात सातत्याने व कठोर कारवाई होणार का, याकडे लक्ष लागले.

## अवैध रेती वाहतुकीवर कारवाई; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड। प्रतिनिधी

किनवट महसूल विभाग आणि पोलिस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईत किनवट शहरालगत रेतीची वाहतूक करणारे एक हायवा वाहन जप्त करण्यात आले. या प्रकरणी वाहनचालकासह तिघांविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. ८) पहाटे सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान एका हायवा वाहनातून रेतीची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. संबंधित वाहन आणि त्यामधील रेती असा एकूण सुमारे २५ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस कर्मचारी प्रल्हाद जाधव यांच्या फिर्यादीवरून




भारतीय न्याय संहिता (बीएनएस), जमीन महसूल अधिनियम तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर झाडे पुढील तपास करीत आहेत. तसेच रेती वाहतुकीशी संबंधित आवश्यक कागदपत्रे आणि इतर बाबींचीही सखोल पडताळणी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# जिल्हा महसूल प्रशासनाचे वराती मागून घोडे

## ड्रोनच्या माध्यमातून गोदावरीची पाहणी: घरकुलची वाळू गेली कुठे पथक परेशान!

**गेवराई । सय्यद कौसर**

गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी पट्ट्या मधून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा केला जात आहे हे सर्वांना ठाऊक असतानाही जिल्हा प्रशासन याकडे दुर्लक्ष करत होते आमदार विजयसिंह पंडित यांनी स्पॉट पंचनामा केल्यानंतर जिल्हा प्रशासन जागे झाले आज महसूलच्या एका पथकाने राक्षस भवन व त्या भागामध्ये जाऊन ड्रोन च्या माध्यमातून पाहणी केली तर घरकुलाच्या नावावर वाळूचा काळाबाजार करणारे अधिकारी कर्मचारी आता प्रशासनाच्या रडार वर आहेत हे सर्व झाकण्यासाठी गेवराई तहसीलचे पथक प्रचार करण्यासाठी जिल्हा पथकाच्या मागे पुढे फिरत असल्याचे दिसून आले.

मागील चार दिवसापासून लोकतंत्रणे वाळू माफियांचा आणि गेवराई तहसीलदारांचा कारनामा प्रकाशित केला होता गोदावरी मधून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा केला जातो मात्र



त्यातच आता राज्य शासनाने घरकुलधारकांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचे जाहीर केल्यानंतर गेवराईच्या महसूल विभागाने नवीन भंडारा लावला आणि ज्यांना घरकुल मंजूर झाले ज्यांना वाळू मंजूर झाली त्या घरकुलधारकांना वाळू न देता एका सेतू केंद्राशी संगणमत



### घरकुल लाभार्थ्यांच्या दारात पथक

**गेवराई तालुक्यामध्ये मंजूर घरकुलधारकांना पाच ब्रास मोफत वाळू मिळाले असल्याची नोंद तालुका महसूल दप्तरी झाली असली तरी प्रत्यक्षात त्यांना वाळू मिळाली की नाही हे पाहण्यासाठी तालुक्यातील १८ गावांमध्ये महसूल चे पथक गेले होते यातील ९०% लाभार्थ्यांना वाळूज मिळाली नसल्याचे निदर्शनास आले मात्र कागदावर त्यांना वाळू मिळाल्याचे ओटीपी द्वारे दिसून आले आता याची स्वतः जिल्हाधिकारी चौकशी करून कारवाई करणार आहे**

### तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी रडारवर

गेवराई तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू देणे सुरू केले मात्र ही वाळू लाभार्थ्यांना न देता वाळू माफियांना विकली गेली हे करत असताना गेवराई महसूल प्रशासनाने ज्या गावातील लाभार्थी आहेत तेथील सेतू सुविधा केंद्र असेल संपर्क साधून आधार कार्ड वरील नंबर वरून ओटीपी घेत वाळू घेतल्याचे दाखवण्यात आले त्यामुळे आता तहसीलदारासोबतच तलाठी आणि मंडळ अधिकारी देखील चौकशीच्या फेऱ्यात अडकणार आहेत.

करून संबंधित लाभार्थ्यांचा आधार कार्ड वर आलेला ओटीपी घेऊन ही वाळू चढ्या भावाने विकली गेली याची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली असून रविवारी आणि सोमवारी जिल्हा प्रशासनाच्या पथकाने राक्षस भुवन पांचाळेश्वर खामगाव ◀◀ पान २ वर

# गुंगीचे औषध देऊन अंबाजोगाईतील कॉलेज तरुणीवर अत्याचार; तीन लाखांसह साडेनऊ तोळे सोने उकळले, दोन तरुण जेरबंद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई येथील एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय तरुणीला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर दोघांनी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी अत्याचाराचे फोटो आणि व्हिडिओ कुटुंबाला दाखवण्याची धमकी देत पीडितेकडून तीन लाख रुपयांची रोकड आणि साडेनऊ तोळे सोने लुटले. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

पीडित तरुणी अंबाजोगाई येथे महाविद्यालयीन शिक्षणासाठी राहत असताना तिची ओळख महेश करपे (रा. धारूर) आणि पवन कराड (रा. पांगरी, ता. परळी) या दोन तरुणांशी झाली. हे दोघे तिचा सतत पाठलाग करत असत. एके दिवशी महेश याने तरुणीला जबरदस्तीने मंचुरियन खाऊ घातले, ज्यामध्ये गुंगीचे औषध मिसळले होते. तरुणी बेशुद्ध झाल्यानंतर आरोपींनी तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर पवन कराड यानेही तिला गुंगीचे औषध देऊन पुणे येथील एका लॉजवर नेऊन तिच्यावर अत्याचार केला. दोन्ही आरोपींनी या कृत्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व नातेवाईकांना दाखवण्याची धमकी देत पीडितेला ब्लॅकमेल करणे सुरू केले. या भीतीपोटी आरोपींनी पीडितेकडून वेळोवेळी तीन लाख रुपये आणि साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने उकळले. हा छळ असह्य झाल्याने शेवटी पीडितेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी महेश करपे आणि पवन कराड या दोघांना अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.

# कार अडवून चाकूचा धाक दाखवत महिलांचे दागिने व रोख रक्कम लंपास

बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत पहाटेच्या सुमारास धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात तिघांनी चाकूचा धाक दाखवत महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने व रोख रक्कम जबरीने हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ८ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे ५.२५ वाजण्याच्या दरम्यान आहेस्वडगाव शिवारात धुळेसोलापूर रोडवर ही घटना घडली. फिर्यादी राहुल उद्धवराव पोहेकर (वय ३०, व्यवसायव्यापार, रा. नवीन मोंढा, जालना) हे आपल्या कुटुंबीयांसह क्रेटा कार (एमएच २१ सीजी ०४००) मधून प्रवास करत असताना अज्ञात तीन इसमांनी त्यांना अडविले.यावेळी आरोपींनी चाकूचा धाक दाखवून फिर्यादीची पत्नी, आई व मावशी यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने तसेच पर्समधील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या दरोड्यात फिर्यादीच्या पत्नीच्या अंगावरील सुमारे ४२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व ४५ हजार रुपये रोख, मावशीच्या अंगावरील अंदाजे ३१ हजार ५०० रुपयांचे दागिने तसेच आईच्या अंगावरील सुमारे ५० हजार ७५० रुपयांचे सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ६९ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरनं २०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम ३०९(४), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच प्रभारी अधिकारी ◀◀ पान २ वर

# कुसळवाडी तांड्यावर राज्य उत्पादन शुल्कची कारवाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील कुसळवाडी तांडा शिवारात राज्य उत्पादन शुल्क विभागाने शुक्रवारी सकाळी धडक कारवाई करत डोंगराळ भागात सुरू असलेली हातभट्टी उद्ध्वस्त केली. या कारवाईत २६०० लिटर गूळ व पाणी मिश्रित कच्चे रसायन आणि ५० लिटर तयार हातभट्टी दारू असा एकूण १,०३,५००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आला.




**१ लाख ३ हजारांची हातभट्टी उद्ध्वस्त, दोघांना अटक : २६०० लिटर रसायन नष्ट**

राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक डी. डी. चौरे यांच्या पथकाने ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या ◀◀ पान २ वर

# वादळी वाऱ्याने सौताड्यात सोलर पंप उद्ध्वस्त

सौताडा । प्रतिनिधी

वादळी वाऱ्यामुळे पाटोदा तालुक्यातील पिंपळवाडी शिवाजवळ चेतन लालू सानप यांच्या शेतात असलेल्या सोलार पंपच्या प्लेटा उडून सोलार पंप उध्वस्त झाला. या वादळी वाऱ्यामध्ये या शेतकऱ्यांचे बत्तीस हजार रुपयांचे नुकसान झाले.



पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे दिनांक एक जून रोजी तुफान वादळी वारे सुरू झाल्याने सौताडा शिवारातील पिंपळवाडी शिवाजवळ असलेल्या चेतन लालू सानप यांच्या शेतामध्ये असलेला सोलार पंप उद्ध्वस्त झाला. या सोलार पंपाच्या दोन प्लेट उडून मोठे नुकसान झाले. या वादळी वाऱ्यामध्ये चेतन सानप यांचे ३२ हजार रुपयांचे नुकसान झाले. या वादळी वाऱ्यामध्ये परिसरातील अनेक झाडे उद्ध्वस्त झाली. अनेकांचे गोठे उडून गेले. अनेकांचे पत्रे उडून गेले. यावेळी वादळीवार्या सोबतच गारांचा पाऊसही पडला. या शेतकऱ्याने संबंधित सोलार कंपनीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे.

# अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

आष्टी । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनिषा ग्लोबल स्कूल आणि वनपरिक्षेत्र कार्यालय, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आवारात वृक्षारोपण करून करण्यात आली. यावेळी शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत, हरजोत कौर जोगी तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध प्रकारची वृक्षलागवड करण्यात आली. वृक्षारोपणानंतर पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली. "झाडे लावा, झाडे जगवा" या घोषवाक्यांनी परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांनी ◀◀ पान २ वर

# अतिभारित व अवैध मालवाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध विशेष तपासणी मोहीम सुरू



बीड । प्रतिनिधी

मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार राज्यभरात अतिभारित तसेच अवैध मालवाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध ८ ते १९ जून २०२६ या कालावधीत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ येथील दोन विशेष तपासणी पथके दाखल झाली असून अंबाजोगाई कार्यक्षेत्रातील सहा तालुक्यांमध्ये विशेष वाहन तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेदरम्यान निर्धारित ◀◀ पान २ वर

# स्पर्धेच्या युगात पदवी सोबतच 'आदित्य कॉलेज' ने दिला विद्यार्थ्यांच्या हाताला हक्काचा रोजगार!

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य फार्मसी महाविद्यालय आणि आदित्य डी. फार्मसी महाविद्यालय, बीड येथे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'कॅम्पस इंटरव्ह्यू' मध्ये महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांची 'मेडिझेस्ट' आणि 'मार्क्सन्स फार्मा' या दोन्ही नामांकित फार्मास्युटिकल कंपन्यांमध्ये उच्च पदांवर निवड पदांवर निवड झाली. या विशेष कॅम्पस ड्राईव्हमध्ये अंतिम वर्षातील १०० विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने आपला सहभाग नोंदवला होता.




**बीडमध्ये 'मेडिझेस्ट' आणि 'मार्क्सन्स फार्मा'चा भव्य कॅम्पस ड्राईव्ह; १०० विद्यार्थ्यांमधून १५ गुणवंतांची थेट उच्च पदांवर निवड**

पदवी सोबतच विद्यार्थ्यांना नौकरी मिळावी यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन आदित्य ◀◀ पान २ वर

# संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी अर्ज करावेत

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी समाजकल्याण विभागाने पुढाकार घेतला आहे. समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तरी पात्र आणि इच्छुक विद्यार्थ्यांनी ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी अर्ज करावेत तसेच वसतिगृहाशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांमध्ये मिळून २० शासकीय वसतिगृहे सध्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहेत. यामध्ये बीड, माजलगाव, केज, पाटोदा, परळी वैजनाथ, गेवराई, आष्टी, धारूर, वडवणी आणि अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी २ वसतिगृह चालविले जातात. या सर्व वसतिगृहांची एकूण प्रवेश क्षमता २ हजार विद्यार्थ्यांची असून, यामुळे दुर्गम भागातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर होणार आहे.

प्रवेशित ◀◀ पान २ वर

# आष्टी तालुक्याकडे अन्न व औषध प्रशासन आणि उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष का?

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात सध्या अवैध मावा, गुटखा आणि दारू विक्रीचा व्यवसाय अक्षरशः बोकाळला असून संबंधित यंत्रणांच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. गावागावांत, चौकाचौकांत आणि मुख्य बाजारपेठांमध्ये खुलेआम गुटखा व मावा विक्री सुरू असल्याचे चित्र दिसत असताना, अनेक ठिकाणी अवैध दारूचे अड्डेही राजरोसपणे सुरू असल्याची चर्चा आहे. मात्र या सर्व प्रकारांवर लगाम घालण्यासाठी जबाबदार असलेल्या अन्न व औषध प्रशासन, उत्पादन शुल्क विभाग आणि संबंधित यंत्रणा नेमके काय करत आहेत, असा संतप्त सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे.

आरोग्यासाठी घातक असलेल्या गुटखा आणि मावा विक्रीवर शासनाने कठोर निर्बंध घातलेले असतानाही आष्टी तालुक्यात हे पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याची वस्तुस्थिती चिंताजनक आहे. युवक, अल्पवयीन विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी सर्रास खेळ सुरू असताना संबंधित विभागांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**कारवाईचा फक्त देखावा की अवैध धंद्यांना अभय?**

तालुक्यातील अनेक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी तक्रारी करूनही ठोस आणि परिणामकारक कारवाई होत नसल्याची भावना व्यक्त केली आहे. अधूनमधून एखादी किरकोळ कारवाई करून कर्तव्यपूर्तीचा दिखावा केला जातो, मात्र मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांवर कुठलाही कायमस्वरूपी अंकुश दिसून येत नाही. त्यामुळे या अवैध धंद्यांना नेमके कोणाचे संरक्षण मिळत आहे, अशी चर्चा जनतेत रंगू लागली आहे.

**युवकांच्या भविष्याशी सुरू आहे घातक खेळ**

गुटखा आणि मावा सेवनामुळे कर्करोगासारखे गंभीर आजार होऊ शकतात, हे सर्वश्रुत आहे. तरीही सहज उपलब्धतेमुळे अनेक युवक या व्यसनांच्या आहारी जात आहेत. शाळा आणि महाविद्यालय परिसरातही अशा पदार्थांची विक्री होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. शासन एकीकडे व्यसनमुक्तीचे अभियान राबवत असताना दुसरीकडे अवैध विक्रीला मोकळे रान मिळत असल्याचे वास्तव अत्यंत धक्कादायक आहे.

**अवैध दारूमुळे कायदा-सुव्यवस्थेलाही धोका**

तालुक्यातील काही भागांत अवैध दारू विक्रीचे अड्डे सुरू असल्याचे बोलले जात आहे. अशा व्यवसायांमुळे गुन्हेगारी, भांडणे, कौटुंबिक हिंसाचार आणि सामाजिक अस्थिरता वाढण्याची शक्यता असते. तरीही उत्पादन शुल्क विभागाकडून अपेक्षित प्रमाणात धडक कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

**कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालावे**

राज्यातील कर्तव्यनिष्ठ आणि कठोर प्रशासनासाठी ओळखल्या जाणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर विषयाची दखल घेऊन आष्टी तालुक्यात विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. अवैध मावा, गुटखा आणि दारू विक्रीच्या साखळीचा पर्दाफाश करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जनतेची अपेक्षा आहे.

जनतेचे थेट सवाल

तालुक्यात खुलेआम गुटखा आणि मावा विक्री सुरू असताना कारवाई का होत नाही?

अवैध दारू विक्रीच्या ठिकाणांची माहिती संबंधित विभागांना नाही का?

अन्न व औषध प्रशासनाच्या तपासण्या नेमक्या किती वेळा होतात?

उत्पादन शुल्क विभागाची गस्त आणि कारवाई प्रभावी का दिसत नाही?

युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई कधी होणार?

तक्रारीनंतरही संबंधितांवर गुन्हे दाखल का होत नाहीत?

जनतेची ठाम मागणी

आष्टी तालुक्यात अन्न व औषध प्रशासन, पोलिस विभाग आणि उत्पादन शुल्क विभाग यांनी संयुक्त विशेष मोहीम राबवून अवैध मावा, गुटखा आणि दारू विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच या अवैध व्यवसायांना पाठीशी घालणाऱ्या घटकांचीही चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

"आष्टी तालुका अवैध धंदेमुक्त करा!"

"जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना अभय नव्हे, कठोर शिक्षा द्या!"

"प्रशासन जागे व्हा; अन्यथा जनआंदोलन अटळ!"

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26